युद्धसूक्ति

शततारक

नेपोलियनप्रणीत
युद्धशास्त्राचे मूलभूत सिद्धांत

विक्रेता :
रवींद्र नेने
शंकर टेकडी, बडोदें.

श्री

युद्धसाहित्य १

युद्धसूक्ति

(नेपोलिअनच्या सूक्तींच्या आधारें लिहिलेली
युद्धविषयक कांहीं माहिती)

अनुवादक :

शत-तारक

युद्धसाहित्य प्रकाशन, बडोदें

प्रकाशक :
र. म. नेने,
युद्धसाहित्य प्रकाशन, बडोदें

१९४७

मुद्रक :
कृ. वा. मराठे, बी.ए.
श्रीरामविजय प्रेस, बडोदें

श्री

प्रस्तावना

संकल्पित युद्ध-साहित्यांतील हें पहिलें पुस्तक आहे, तेव्हां या संकल्पाची माहिती देणें आवश्यक आहे.

मराठींत काव्य, नाट्य, कथा, कादंबरी वाङ्मय विपुल आहे. इतिहास वाङ्मय हि बरेंच आहे. शास्त्रीय वाङ्मयाकडे हि मराठी साहित्यिकांची ओढ आहे. पण साहित्याच्या कित्येक शाखा मराठी साहित्यवृक्षाला अजून फुटल्या नाहींत, तर कित्येक शाखांची वाढ अजून खुरटी आहे. मराठी-युद्धसाहित्य वरील दोन प्रकारांपैकीं दुसऱ्या प्रकारांत मोडतें. या साहित्य-प्रकारांतील आजवरचें प्रकाशन हातांच्या बोटांवर मोजण्याइतकें अत्यल्प आहे असें म्हटलें तर तें चुकीचें होणार नाहीं.

युद्धसाहित्य लेखन प्रकाशनाच्या बाबतींत बडोद्याच्या सेनापति (जनरल) नानासाहेब शिंदे यांचें नांव प्रथम उल्लेखिलें पाहिजे. मराठ्यांच्या प्रसिद्ध लढाया, हिंदुस्थानचा लष्करी इतिहास, दोस्त राष्ट्रांच्या फौजा वगैरे पुस्तकें आणि अनेक लेख लिहून युद्धसाहित्याचा पाया त्यांनीं घातला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रतापगडचें युद्ध लिहिणाऱ्या कॅप्टन मोडक यांचा हि उल्लेख युद्ध-साहित्यिक म्हणून केला पाहिजे. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांचीं वर्णनें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांत दे. भ. कृष्णाजी प्रभाकर

खाडिलकर यांचीं पहिल्या महायुद्धाचीं वर्णनें व 'सकाळ' दैनिका तर्फे दुसऱ्या महायुद्धाचा प्रसिद्ध झालेला धांवता आढावा उल्लेखनीय आहेत. हीं झालीं युद्धवर्णनांचीं पुस्तकें. युद्धांत उपयोगांत आणल्या जाणाऱ्या शस्त्रास्त्रांचीं वर्णनें, माहिती, नियत-कालिकांतून प्रसिद्ध झालीं आहेत पण तीं तुटपुंजीं असल्यानें युद्धसाहित्याच्या दृष्टीनें त्यांचें महत्त्व नाहीं. श्री. मराठे यांचें आधुनिक शस्त्रसंभार नांवाचें पुस्तक नियतकालिकांतील प्रासंगिक लिखाणांपेक्षां बरें म्हणावें लागेल. अशा तऱ्हेनें युद्धांबाबत मराठींत पुस्तकें असलीं तरी युद्धविषयक शास्त्रीय माहिती, युद्ध कसें खेळावें, करावें वगैरे विषयीं माहिती देणारीं पुस्तकें मराठी भाषेंत अद्याप लिहलीं गेलीं नाहींत. निदान युद्धकला अथवा युद्धशास्त्रावरील मराठी पुस्तक माझ्या तरी पाहण्यांत नाहीं.[१]

ही उणीव भरून काढण्यासाठीं व पुढें दर्शविलेली तात्कालिक गरज भागविण्यासाठीं युद्धकला अथवा युद्धशास्त्रावर तसेंच युद्धाच्या अनेक अंगोपांगांवर व युद्धविषयक निरनिराळ्या बाबतींवर मराठींत पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा माझा विचार आहे. यासाठीं सुरवातीस निरनिराळ्या पाश्चात्य व पौरस्त्य मातबर युद्धधुरंधरांनीं या विषयांवर लिहिलेल्या पुस्तकांच्या आधारें मराठींत पुस्तकें लिहून प्रसिद्ध करण्याचा संकल्प केला आहे.

---

१ अलीकडे श्री. ह. वा. देशपांडे यांनीं दोन प्रसिद्ध युद्धतंत्रें या नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. त्यांत हिटलरचें तडित् युद्धतंत्र व रशियाचें जानपद युद्धतंत्र यांज विषयीं माहिती असल्याचें कळतें.

पुण्यश्लोक श्री शिवरायाचे मराठे सवाशें दीडशें वर्षें युद्धें खेळले, हीं सर्व वर्षें त्यांच्या विजिगीषु नेतृत्वाचीं होतीं. त्यांनीं युद्धकला आत्मसात् केली होती, पण पुढें दुर्दैवानें त्या नंतरचीं शंभर सवाशें वर्षें मराठे उसनी शिपाईगिरी करीत आहेत; स्वराष्ट्रा-साठीं, स्वधर्मासाठीं त्यांनीं भारतांत युद्धनेतृत्व स्वीकारलें होतें हें सत्य आतां इतिहास जमा झालें आहे. युद्धनेतृत्व गेल्यामुळें युद्धशास्त्राच्या ज्ञानाची मराठ्यांनीं उपेक्षा केली, त्याविषयीं अनास्था दाखविली, त्यामुळें साहजीकच या ज्ञानाचा लोप होऊं लागला आणि आज जर तें शिल्लक असलें तर तें राखेनें अवगुंठित स्फुलिंगायेवढेंच काय तें शिल्लक असण्याचा संभव आहे.

पण ही परिस्थिति आतां अशीच राहूं देणें हितावह नाहीं. भारत वर्षाच्या राजकीय परिस्थितींत यापुढें झपाट्यानें बदल होत जातील. हिंदुस्थान स्वातंत्र्यमंदिराच्या अगदीं दारांत यदृच्छेनें येऊन उभा आहे. स्वातंत्र्य प्राप्त झालें म्हणजे जबाबदारी वाढ-णारच. सर्वांत मोठी जबाबदारी म्हणजे देश संरक्षणाची. आजवर ही जबाबदारी आपणावर नव्हती. इंग्रज बहादुरांच्या संगीनी आपणांतील शिपाईगड्यांच्या साह्यानें ही जबाबदारी पार पाडीत होत्या. पण आतां परिस्थिति बदलली आहे. हिंदुस्थानाचें विच्छे-दन केलें गेल्यामुळें चाराच्या चौपट सरहद्दी होऊं पहात आहेत. त्यांचें संरक्षण करणें पूर्वीपेक्षां किती तरी पटीनें अवघड काम आहे. नवीन सरहद्दी अशा विक्षिप्त प्रकारें निश्चित होत आहेत कीं त्यांत नैसर्गिक संरक्षणक्षमता राहूं नये. याचा युद्धनैतिक अर्थ

हाच कीं हिंदुस्थानाचें सैन्य निव्वळ संरक्षणक्षम ठेवून चालणार नाहीं. सैन्याची शक्ति संरक्षणक्षमतेपेक्षां हि अधिकतर पाहिजे. म्हणजेच सैन्यांत आक्रमणक्षमता हवी आणि ती हि जबरदस्त प्रमाणांत हवी.

या सर्व बाबतींकडे लक्ष्य ठेवून सैन्य कार्यक्षम ठेवण्याची शक्ति मराठी नेतृत्वांत होती आणि अजूनहि आहे असें मी म्हणतो. मात्र श्रीशिवरायाच्या काळांत व त्या नंतरच्या काळांत वैयक्तित स्वार्थ बाजूस ठेवून मराठे जसें स्वधर्म व स्वराष्ट्रासाठीं ऐकोप्यानें वागलें तसें आज व या पुढें नित्य त्यांनीं वागावयास हवें. येवढें केलें तर हिंदुस्थानाचें राजकीय, सामाजिक व यौद्धिक नेतृत्व मराठ्यांकडे चालत येईल. तेवढ्यासाठीं आधुनिक युद्ध-कलेचें अथवा युद्धशास्त्राचें ज्ञान आपण मिळविलें पाहिजें आणि म्हणून युद्धशास्त्रावरील पुस्तकें सुबोध मराठींत लिहिलीं गेलीं पाहिजेत. पुस्तकी ज्ञानानें सेनापति तयार होऊं शकत नाहीं असें म्हणणें चुकीचें आहे; कारण प्रतिभासंपन्न सेनापति एखादाच असतो पुष्कळ सेनानी पुस्तकी विद्येच्या साहाय्यानें प्रतिभा संपन्न होऊं शकतात. तसें नसतें तर अलीकडील काळांतील पाश्चिमात्य देशांतील युद्धनेते विजयी होऊं शकते ना, कारण त्यांपैकीं कोणीं कार्तिकेया सारखा जन्मतःच रणधुरंधर असल्याचा कुणाचा दावा नाहीं. अलीकडील सर्वच युद्धनेते सैनिकी शिक्षण विद्या-लयांत शिकून तयार झाले आहेत.

अशा सैनिकी शिक्षण विद्यालयांत भावी सेनानी, युद्धनेते

तयार करतांना विद्यार्थ्यांकडून मुख्यतः नेपोलिअन, फ्रेडरिक दि ग्रेट, मॉरिस डी साक्झे, व्हेजेटिअस, सुन त्सु, योमिनि, फोन डर गोल्त्स, फोन क्लॉझेवित्स, कर्नल हेंडरसन, वगैरे अनुभविक आणि मातब्बर सेनानींचीं पुस्तकें शिक्षणाचा पाया दृढ करण्याच्या दृष्टीनें वांचून घेण्यांत येतात. तेव्हां अशा पुस्तकांस मराठी पहेर-वेश दिला तर मराठी वाचकांस त्यांचा पुष्कळ उपयोग होईल असें वाटल्यानें तशा प्रकारचा प्रयत्न मी करीत आहे. शस्त्रास्त्रांत आमूलाग्र क्रांति झाली असल्यानें जुन्या विद्येचा आतां कांहीं उप-योग होणार नाहीं असा आक्षेप येण्याचा संभव आहे. पण शस्त्रां-स्त्रांतील क्रांतिमुळें युद्धशास्त्राच्या प्राथमिक तत्त्वांत कांहींच बदल झालेला नाहीं; त्यामुळें वरील सारखा आक्षेप कोणीं घेऊंच शकत नाहीं.

प्रथम नेपोलिअनच्या युद्धसूक्तींच्या आधारें "युद्धसूक्ति" हें पुस्तक तयार केलें आहे. पूर्ण भाषांतर अगर अनुवाद न करतां नेपोलिअनच्या युद्धसूक्तींचा मागोवा घेत घेत नेपोलिअनचेच विचार मराठी भाषेंत उतरविण्याचा मी प्रयत्न केला आहे. विषय समजण्यास अडचण पडूं नये यावर अधिक कटाक्ष आहे व तेवढ्यासाठीं मूळ लेखकाच्या विचारात फरक न होईल इतकी खबरदारी घेऊन मजकुराचा विस्तार अगर संकोच केला आहे. पण त्यांत हि संकोच केलेलीं ठिकाणें अत्यल्प आहेत. सूक्तींच्या आधारें पुस्तक लिहिलें असल्यानें विषय प्रतिपादनांत विस्कळीत-पणा आल्यासारखें दिसतें पण त्याला इलाज नव्हता.

युद्धसाहित्य प्रकाशनाचा माझा हा प्रयत्न आपणास पसंत पडेल व आवडेल आणि आपण या माझ्या प्रयत्नास सक्रिय साहाय्य कराल अशी अपेक्षा आहे.

बडोदें

ता. २१-७-१९४७

शततारक

श्री

युद्धसूक्ति

(१)

देश असो अगर राष्ट्र असो प्रत्येक देशाला अगर राष्ट्राला सीमाप्रांत असतोच. सीमाप्रांत एकच दिशेला नव्हें तर चौफेर असतात. अशा सीमाप्रांतांच्या अगदीं शेवटच्या प्रदेशांना सरहद्दी म्हणतात.

(२)

या सरहद्दी निरनिराळ्या प्रकारच्या असूं शकतात. सरहद्दीवर कोठें समुद्रासारखे महान् जलाशय असतील; कोठें सरहद्दीवर मोठमोठ्या नद्या द्रुतगतीनें पळत असतील; कोठें कोठें उत्तुंग पर्वत श्रेणी अचल ठाण मांडून बसल्या असतील; तर कोठें वाळवंटांनीं आपला फापट पसारा मांडला असेल. किंवा वरील गोष्टीपैकीं एक हि वस्तु सरहद्दीवर नसूं शकेल म्हणजे सरहद्दीवर सपाट जमीन, छोटीशी नदी, दरी अगर जंगल पण असूं शकेल.

(३)

समुद्र, मोठ्या नद्या, पर्वतराजी, वाळवंटें हीं सर्वच सैन्याच्या चालीला खीळ घालणारीं आणि अडथळा उत्पन्न करणारीं आहेत.

सैन्य अगदीं वेगवान्, द्रुतगती, असलें तरी हि वरील गोष्टींमुळें त्याचा वेग, त्याची गति कमी होतेच.

या अडथळयांचा त्यांच्या त्रासदायकपणावरून क्रम लावावयाचा झाला तर मानाचें पहिलें स्थान वाळवंटांना दिलें पाहिजे, दुसरा क्रम समुद्रांचा लागेल, तिसरा पर्वत श्रेणींचा क्रम लागेल व चौथा क्रम मोठाल्या नद्यांचा येईल. बाकीचे प्रकार या नंतरच्या क्रमांत यावेत.

(४)

युद्धाचे सामान्यतः दोन प्रकार कल्पिलेले आहेत. एक प्रकार आक्रमक युद्धाचा व दुसरा प्रकार बचावाच्या युद्धाचा. आक्रमक युद्ध आणि बचावाचें युद्ध या दोहोंची तुलना केली तर बचावाचें युद्ध खेळणें अधिक कठिण आहे. विजिगीषु पुरत्या तयारीनें आलेला असतो, त्याची धडक जबर असते आणि आपली धडक मंदावणार नाहीं, वाढती राहील याविषयीं त्याचा अखंड प्रयत्न चालू असतो. विजिगीषूची पुऱ्या वेगानें आणि पुऱ्या नेटानें येणारी धडक झेलणें, जिरविणें व त्याचें बळ व हिंमत खच्ची करून प्रत्याक्रमण करणें हीं बचावाच्या युद्धाचीं अंगें आहेत. या अंगांचें तंत्र सांभाळतांना बचावाचें युद्ध खेळणाऱ्या सेनापतीला विजिगीषूपेक्षां वरचढ हिकमती, डावपेंच लढवावें लागतात व त्यामुळेंच बचावाचें युद्ध आक्रमक युध्दांपेक्षां कठीण वाटतें.

विजिगीषूला हि आक्रमक युद्ध करण्यासाठीं अनेक अवधानें सांभाळावी लागतात. आज ठिनसलें आणि उद्यां आक्रमण सुरूं केलें असें करून भागत नाहीं. आक्रमक युद्धाची तयारी शांततेच्या काळांतच करावी लागते, व आक्रमणाचा पुरता आराखडा आंखून ठेवून त्याप्रमाणें जय्यत तयारी ठेवावी लागते. तसेंच आक्रमण सुरूं झालें कीं आराखड्या-बरहुकूम कसोशीनें मोहीम पुरी करावी लागते. मोहिमेची रूपरेषा अर्थात् आराखडा आंखतांना शत्रु काय काय करूं शकेल ती प्रत्येक वस्तु, हालचाल, हेरतां आली पाहिजे; आणि विजिगीषूच्या आराखड्यांत त्या सर्वांवर मात करतां येईल अशा साधनांची योजना असली पाहिजे.

(५)

मोहिमेचा आराखडा आंखला म्हणजे तो वज्रलेप समजण्याचें कारण नाहीं. मोहीम सुरूं करतेवेळची परिस्थिति, सेनाधिपाची प्रतिभा, सैनिकांची प्रत, शस्त्रास्त्रसरंजामाचा वरचढ-पणा, युद्धभूमीच्या जमीनीचा उंचनिंचपणा वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन आयतेवेळीं मोहिमेच्या रूपरेषेंत परिस्थितीला जुळतील असें फेरबदल करावें लागतात.

(६)

युद्धमान सैन्याचीं साधारणतः तीन अंगें अथवा अवयव कल्पिलें आहेत. एक मध्य आणि दोन्हीं बाजूंचीं पांखें हीं तीं

अंगे होत, त्यांना डावी बगल (पांखें) उजवी बगल (पांखें), मध्य अथवा तोंड अशीं नांवें देतात.

अलीकडे युद्धांत विमानांचा उपयोग होऊं लागल्यानें सैन्याचीं आणखी एक बाजू उघडी पडूं लागली आहे. त्या बाजूला ऊर्ध्व बाजु असें नांव दिलें पाहिजे. हिचें संरक्षण विमानें व विमान विरोधी तोफांनीं करावें लागतें.

सैन्य ज्यावेळीं युद्धाच्या तयारीनें निघतें त्यावेळीं सैन्याच्या दोन्ही पांखांवर तटस्थ देश असूं शकतील अगर पर्वत, मोठ्या नद्या, समुद्र अशा सारखें नैसर्गिक संरक्षण असूं शकेल अगर वरील प्रकारचें संरक्षण एकच पांखावर असेल अगर दोन्ही हि बगला उघड्या म्हणजे असंरक्षित असूं शकतील.

सैन्याच्या दोन्ही हि बगला संरक्षित असल्या म्हणजे सेनापतीचें काम थोडें सोंपें होतें. कारण त्याला सैन्याच्या अघाडीच्या भागाची फळी फुटणार नाहीं कीं शत्रूकडून फोडली जाणार नाहीं येवढेंच बघावयाचें असतें, पण त्याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं अशा वेळीं बगलांकडे दुर्लक्ष केलें तरी चालेल. दोन्ही हि बगलांची काळजी तर घ्यावीच लागते पण विशेष काळजी अघाडीच्या भागाची घ्यावी लागते येवढाच त्याचा अर्थ. कारण सामान्यतः सेनापतीला कोणत्या हि बाबतींत असावध राहून चालत नाहीं.

सैन्याची एकच बगल संरक्षित असेल त्यावेळीं असुरक्षित

बगलेला सुरक्षित बगलेकडून मदत होण्याची व्यवस्था केली पाहिजे, असुरक्षित पांखांची सर्व मदार सुरक्षित पांखावर ठेविली पाहिजे.

दोन हि बगला असुरक्षित असल्या म्हणजे सेनापतीची जबाबदारी त्या प्रमाणांत वाढती असते. सैन्याच्या मध्यभागाकडून संकटाच्या वेळीं दोन हि बगलांना पुरती मदत मिळेल अशी व्यवस्था सेनापतीनें ठेविली पाहिजे. दोन हि बगलांची भिस्त, मदार, अशा वेळीं मध्यावरच पडणार, तेव्हां साहजिकच सैन्याच्या दोन हि बगला मध्यापासून फुटणार नाहींत, दुरावणार नाहींत अशा विषयीं सेनापतीनें अधिक काळजी घ्यावयास हवी. कारण मध्यापासून जर बगला दुरावल्या तर मध्य व बगलांमध्यें शत्रू पाचर मारूं शकतो व दोहीं ऐवजी चार सहा बगला तयार होऊन सर्वच उघड्या पडतात व साहजीकच अडचणींचें मान हि दुपटी तिपटीनें वाढतें. मध्यांपासून दळें सुटी पडणें म्हणजे सैन्याचें दोनतीन स्वतंत्र खंड पडणेंच होय.

(७)

सैन्य कूच करीत असलें तरी निरनिराळ्या कामासाठीं अथवा डावपेंची अगर हिकमतीच्या हालचाली करण्यासाठीं सैन्याच्या छोट्या मोठ्या टोळ्यांना पुढें मागें हालचाली कराव्या लागतात. या हालचाली ज्या भागांतून करण्यांत येतात त्यांना वावरण्याच्या वाटा अगर मार्ग म्हणतात. सैन्याच्या अशा वावरण्याच्या वाटा हि सुरक्षित ठेवाव्या-लागतात.

सैन्याच्या दोन्ही बगला ज्या वेळीं सुरक्षित असतील त्यावेळीं वावरण्याचे मार्ग डाव्या किंवा उजव्या बगलेकडे कुठेंही ठेवलें तरी चालतील. अशा वेळीं अमुकच बगलेच्या बाजूला वावरण्याचे मार्ग ठेवलें पाहिजेत असें नाहीं. मात्र वावरण्याच्या वाटा अमुक बाजूकडे एकदां नक्की केल्या म्हणजे ज्या बगलेकडे त्या ठेवण्यांत आल्या असतील त्या बगलेवर वावरण्याच्या वाटांवरून होणाऱ्या हालचाली रक्षणाची जबाबदारी पडते. मग संकट असो नसो. या वाटांवरून होणाऱ्या सर्व हालचालींची भिस्त किंवा मदार अगर मदतीचें स्थान ज्या बाजूकडे त्या वाटा असतील त्या बाजूवर असते.

सैन्याची एकच बाजू ज्यावेळीं सुरक्षित असेल त्या वेळीं जी बगल सुरक्षित असेल त्या बगलेच्या बाजूसच वावरण्याचे मार्ग ठेवावेत. अशा वेळीं अर्थात्च वावरण्याच्या वाटांची मदार सुरक्षित बगलेवरच राहणार.

ज्या वेळीं दोन्ही ही बगला किंवा पांख असुरक्षित असतील त्या वेळीं वावरण्याच्या वाटांची मदार आणि वावरण्याचे मार्ग सैन्याच्या मध्यभागीं जी फळी असते त्या फळीच्या अगदीं मध्यभागाच्या समोर सरळ रेषेवर असावेत.

(८)

सैन्याच्या पांचव्या अगर सहाव्या दिवसाच्या मजलेवर गढी, कोट अगर किल्ला पाहिजे अगर खंदकांनीं संरक्षित जागा पाहिजे. असें ठिकाण असलें म्हणजे त्या ठिकाणीं सैन्याच्या उपयोगासाठीं

दारूगोळा सांठवून ठेवतां येतो, रसद सांठवून ठेवतां येते व सैन्योपयोगी इतर सामग्री हि ठेवतां येते, तसेंच तीं पोंचवावयाची व्यवस्था करतां येते. अशा स्थळाचा उपयोग पुरवठाकेंद्रासारखा व कूचकेंद्रासारखा करतां येतो व त्यामुळें वावरण्याची वाट लांबीला लहान राहूं शकते. वावरण्याची वाट जितकी लहान तितकीं संकटें हि कमीच.

(९)

सैन्यभाराचे निरनिराळे गट करून प्रत्येक गटाला वेगवेगळ्या मार्गांनीं उद्दिष्ट स्थलावर चालून जाण्यास सांगितलें तर अशा प्रत्येक गटाच्या वावरण्याच्या वाटा वेगवेगळ्या असतात. अशा रीतीनें निरनिराळ्या मार्गांनीं चालून जाणाऱ्या सैन्यांना विवक्षित स्थळीं एकत्र जमण्याचा हुकम असला तर हें एकत्र जमण्याचें स्थळ शत्रूपासून जवळपास निवडूं नये. कारण अशावेळीं शत्रू आपलें सर्व बळ एक ठिकाणीं एकवटून विजिगीषूच्या सैन्याच्या एकेका गटाला निरनिराळ्या वेळीं गांठण्याच्या प्रयत्न करील व निरनिराळे गट एकत्र होण्यापूर्वीच एकेकाला गांठून त्यांचा एकामागून एक पराभव करील.

(१०)

सर्व युद्ध पद्धतशीर असावें. प्रत्येक युद्ध कांहीं उद्दिष्ट ठेवून करावें. युद्धाची आखणी युद्धकलेचे नियमाबरहुकूम करावी.

हेरतां येईल अशा अडचणीं त्यांच्या योग्य प्रमाणांत साधनें वापरून दूर कराव्यांत.

मोहिमेच्या सुरवातीसच मोहीम सुरू करावी अगर करूं नये, चालून जावें अगर जाऊं नये, त्याचा पुरता आणि काळजीपूर्वक विचार करण्याची जरूर आहे; पण एकदां आक्रमण सुरू केलें कीं तें अगदीं शेवटापर्यंत दाटून चालूं ठेविलें पाहिजे. माघार शक्यतों घेऊं नये. माघार घेण्याचा परिणाम सैन्याच्या मानसिक खंबीरपणावर विपरीत होतो. अतिकुशलतेनें हालचाल करून माघार घेतली असली तरी हि असा परिणाम झाल्यावांचून राहात नाहीं. कारण माघार घेतल्यानें यशाचा संभव तर गेलेलाच असतो, आणि वर शत्रूच्या हातीं सैन्य दिल्यासारखें होतें. शिवाय अत्यंत भीषण हातघाईच्या प्रसंगीं माणसें व साधनें यांचें नुकसान होऊं शकतें त्यापेक्षां हि अधिक नुकसान माघार घेतांना माणसें व साधनांचें होतें. लढाईत उभयपक्षांचें जवळ जवळ सारखेंच नुकसान होतें पण माघार घेण्यांत माघार घेणारांचेंच नुकसान होतें.

(११)

सैन्याची जेवढी प्रतिकारक्षमता असेल तेवढी सर्व वापरून प्रतिकार करण्याला प्रत्येक दिवशीं, प्रत्येक रात्रीं, प्रत्येक घटकेलाच काय पण प्रत्येक क्षणीं सैन्य जैय्यत तयार असलें पाहिजे. म्हणून सैनिकांचीं शस्त्रास्त्रें व दारूगोळा त्यांच्या हाताशीं असणें अवश्यक आहे. पायदळाबरोबरच तोफखाना, घोडदळ व सेनापति हाजर

असले पाहिजेत. सैन्याचे निरनिराळे विभाग एक दुसऱ्याला मदत करूं शकतील, एक दुसऱ्याचें संरक्षण करूं शकतील, आणि एक दुसऱ्याला पुरवठा पुरा पाडूं शकतील अशा स्थळीं असावेत.

(१२)

सैन्य डेरे देऊन असो, चाल करून जात असो, अथवा उसंत घेत असो, यापैकीं प्रत्येक वेळीं सैन्य फायदेशीर स्थळीं राहील अशा तऱ्हेनेंच सैन्यासाठीं स्थळ निवडलें पाहिजे. समर-प्रसंगाला अर्थात् हातघाईच्या किंवा गोळा गोळीच्या लढाईला योग्य असलेल्या स्थळांत जेवढे गुण असावे लागतात तेवढे सर्व गुण अशा स्थळांत असले पाहिजेत. स्थळ असें हि असावें कीं जेथून सैन्याच्या सर्व बगलांना वा पाखांना सर्व वेळीं चांगली मदत होऊं शकेल.

(१३)

सैन्याचा तोफखाना केव्हां हि उपयोग होऊं शकेल अशा ठिकाणीं ठेवावा.

(१४)

अघाडीवर व डाव्या उजव्या बगलेवर शत्रूच्या काय हालचाली चालू आहेत तें पाहण्यासाठीं सैन्य चालून जात असल्यावेळीं अघाडी राखणारीं व बगला राखणारीं पथकें असावींत. अशा पथकांना टेहळीं पथकें म्हणतात. सैन्याची पुनर्रचना करतांना, सैन्य पसरून टाकतांना, अथवा युद्धासाठीं सैन्याचा पवित्रा रचतांना वर सांगितलेल्या टेहळ्या पथकांची आवश्यकता असतें.

तसेंच सैन्याच्या मुख्य भागाला मुक्काम टाकतां यावा येवढ्यासाठीं हि असलीं अघाडी व बगलां वरील टेहळीं पथकें ठेवावीं लागतात.

(१५)

शत्रूचें सैन्य आपल्या अघाडीवर अथवा डाव्या उजव्या बगलेवर एकाएकीं कोसळलें तर आपण काय करूं शकूं, काय काय करतां येण्यासारखें आहे असा विचार सेनापतीनें प्रतिदिनीं केला पाहिजे. या प्रश्नांचीं उत्तरें देतांना त्याला जर घोटाळल्या सारखें वाटलें, केलेली व्यवस्था वाईट आहे असें दिसून आलें, व्यवस्थेंत कांहीं खामी असल्याचें आढळलें तर त्यानें सैन्याच्या रक्षणाची व सैन्याची नवीन व्यवस्था ताबडतोब केली पाहिजे.

(१६)

सैन्याची शक्ति मोजण्याचें हि मोजमाप असतें. सैन्याच्या एकंदर संभाराला सैन्याच्या गतीनें गुणलें कीं आलेला गुणाकार हीच सैन्याची शक्ति. जितका संभार जास्त आणि त्या संभाराची जितकी गति तितकी सैन्याची शक्ति हि जास्त. हें प्रत्येक वेळीं ध्यानांत ठेवूनच सैन्यें तयार केलीं पाहिजेत. जलद चाल सैन्याच्या हिंमतीवर चांगला परिणाम करतें. आणि त्या मुळें जय मिळविण्याच्या साधनांत उत्तम भर पडते.

(१७)

शत्रु-सैन्यापेक्षां आपलें सैन्य संख्येनें कमी असलें तर जलद मजला करून शत्रूवर मात करावी व अशा रीतीनें संख्येची

उणीव भरून काढावी. आपल्या सैन्यांत प्रतिपक्षाच्या सैन्यापेक्षां घोडदळ कमी असलें तर घोडदळाची कमतरता शत्रूला घोडदळ वापरायला कठिण जाईल अशी जागा शोधून काढून. ही कमतरता भरून काढावी. आपला तोफखाना शत्रूपेक्षां कमी असेल तर हें न्यून सारख्या हुलकावण्या देऊन व हालचाली करून भरून काढावें. शत्रूपेक्षां आपणाकडे वरील गोष्टींची कमताई असली तर अशा वेळीं ठाण मांडून युद्ध घेऊं नये. तसेंच असल्या कमी-पणाच्या वेळीं सैनिकांत आत्मविश्वास नांदणें अधिक महत्वाचें आहे.

(१८)

एकमेकांपासून फार दूर असलेल्या मार्गांवर एकाच वेळीं सैन्याच्या हालचाली करणें चांगलें नव्हे. शिवाय अशा दोन मार्गांतील दळणवळणासाठीं कांहींच मार्ग नसेल तर अशा दोन मार्गांवर एकाच वेळीं हालचाली करणें फारच वाईट.कारण दूर अंत-रावरच्या मार्गांवर हालचालीस गेलेल्या टोळ्यांना अथवा स्तबकांना सामान्यतः एकाच दिवसापुरते हुकूम दिलेले असतात. सैन्याच्या मुख्य भागाच्या परिस्थितिवर असल्या स्तबकांच्या (टोळ्यांच्या) हालचाली अवलंबून असतात. मुख्य सैन्यापासून अगर एकमेकां-पासून स्तबक दुरावले म्हणजे प्रसंग पडेल तसे ते अहेतुक वागत असतात, अगर हुकमाची वाट पहात तिष्ठत बसतात. अगदीं दूर दूरच्या भागांत हालचाली करणें आवश्यकच असेल तर दुरावलेल्या किंवा तुटलेल्या सैन्याला अथवा सैन्याच्या स्तबकाला

(गटाला) त्याच्या जबाबदारीवर हालचाली करण्याचें स्वातंत्र्य दिलें पाहिजे.

दोन स्तबकें दूर दूरच्या मार्गांवर हालचाली करणार असलीं तर त्यांनीं प्रथम पासूनच अमुक ठिकाणीं एकत्र यावयाचें असा संकेत करून ठेवावा व त्या ठिकाणीं एकत्र होण्याचा प्रयत्न करावा. त्यांना शत्रु वेगवेगळ्या ठिकाणीं गांठणार नाहीं अशी खबरदारी त्यांनीं घ्यावी.

(१९)

सैन्याच्या हालचालीचा मार्ग एकच असावा व तो काळजी-पूर्वक आणि खबरदारीनें संभाळावा. अशा तऱ्हेनें संभाळून ठेवलेला हालचालीचा मार्ग महत् संकटें आलीं तरच सोडावा.

(२०)

चाल करून जाते वेळीं दोन सैन्य भागांतील अंतर किती असावें तें त्या त्या भूप्रदेशाची परिस्थिति, त्या वेळेची एकंदर परिस्थिति आणि त्यावेळचे उद्दिष्ट यांवर अवलंबून असतें.

(२१)

डोंगरांत निसर्गतःच बळकट अशीं पुष्कळ ठाणीं असतात. तीं सर करण्यासाठीं समोरून कधीं हि हल्ला करू नये. अशीं ठाणीं जिंकण्याची रीत वेगळी आहे. शत्रूच्या बगलेवर अगर पाठीवर तळ टाकलें तर शत्रूला अशीं ठाणीं लढाई न देतां सोडावी

लागतात, अगर शत्रूला मागें हटावें लागतें अथवा ठाणीं सोडून आपणांवर हल्ला चढविणें तरी त्याला भाग पडतें. डोंगरी युद्धांत चढाई करणाऱ्या पक्षाला प्रतिकूल परिस्थितीशीं फार झगडावें लागतें. चढाईच्या लढाईत सुद्धां, आपली पुरती तयारी ठेवून, प्रतिपक्षाला आपणांवर हल्ला करण्यास भाग पाडण्यांत व आपण फक्त प्रतिकार-युद्ध खेळण्यांत अधिक कौशल्य असतें.

(२२)

लढाई देतांना स्वतःच्या शस्त्रास्त्रांचा व स्वतःचा यशोगौरव शाबूत ठेवणें हें प्रत्येक सेनापतीचें आद्य कर्तव्य आहे. स्वतःचीं प्यादीं वांचविणें हें दुय्यम कर्तव्य समजावें. स्वतःचा यशोगौरव शाबूत राखण्यासाठीं जी चिकाटी आणि जो निश्चय दाखविला जाईल त्यामुळेंच आपोआप प्यादीं हि वांचलीं जातील. माघार घेण्यांत अथवा पीछेहाटींत सेनापतीच्या शस्त्रास्त्रांची व स्वतः सेनापतीची हि मानहानी होतेच; पण तद्उपरांत दोन लढाया खेळून कामास येणार नाहींत इतकीं प्यादीं कामास येतात. यास्तव जोंपर्यंत शूर गडी तुमच्या निशाणा भोंवतीं असतील तोंपर्यंत निराश होऊं नये; मार, पीट, हाण चालू ठेवावी. अशा रीतीनें लढणारालाच जयश्री वरते.

(२३)

आपण अमुक करावें असें शत्रु इच्छीत असेल तर नेमकें तेंच आपण करूं नये. शत्रूला तुम्ही अमुक करावें असें वाटतें तेंच तें न करण्यासाठीं महत्त्वाचें कारण आहे.

ज्या रणक्षेत्राचा शत्रूनें अभ्यास केला असेल, ज्या रणक्षेत्राची शत्रूनें टेहळणी करून ठेवली असेल अशीं रणक्षेत्रें आपण टाळावींत. त्याच प्रमाणें ज्या रणक्षेत्राची शत्रूनें तटबंदी केली असेल, तसेंच जेथें शत्रू खंदकबंदी करून राहिला असेल अशी हि रणक्षेत्रें युद्धांसाठीं निवडूं नयेत.

ज्या जागेवर, स्थळावर अगर ठाणें वगैरे वर त्याच्या बगलेकडून हल्ला करतां येतो त्या जागेवर तोंडा समोरचा हल्ला करूं नये. म्हणजे ज्या जागेची बगल फिरत अथवा वळसा घेऊन मारतां येते त्या जागेवर तोंडासमोरचा हल्ला करूं नये.

(२४)

मनुष्य-बळ, शस्त्रास्त्रें, ताकद व इतर साधनांच्या दृष्टीनें शत्रूचें बळ जास्त असेल तर शत्रूशीं समोरासमोर लढाई देणें हितावह होणार नाहीं. अशा वेळीं घाईच्या मजला, हुलकावण्या, हिकमतीच्या हालचाली करून शत्रूस दमवावे, हातघाईची लढाई शक्यतों टाळावी, कारण अशा वेळीं हातघाईची लढाई झाली तर त्यांत आपला पराभव होण्याचाच संभव जास्त असणार. असल्या विषम परिस्थितींत नैसर्गिक बचावाच्या जागा हि कमजोर पडतात. तरी हि आपल्या सैन्याचा रात्रीं मुक्काम करते वेळीं खंदकबंदी करूनच मुक्काम करावा. सेनापतीचें युद्धकौशल्य वरीलसारख्या परिस्थितींतच पारखलें जातें.

(२५)

सैन्याचा तळ वाईट जागीं पडला असला व अशा वेळीं

शत्रूनें मोठ्या जमावानिशीं अचानक हल्ला केला तर सामान्य प्रतीचा सेनापति मागें हटून सुरक्षित राहील. पण सेनापति असामान्य प्रतीचा असला तर तो शत्रूची हालचाल हेरून अथवा शत्रूची हालचाल दिसून आल्यावर हि त्याच्यावर विद्युत्वेगानें चालून जाईल व आपल्या शस्त्रास्त्रांचा प्रखर-पणा व आपला दणकटपणा व खंबीरपणा शत्रूला दाखवून शत्रूला फजित करील. सेनापतीच्या अशा कृत्यामुळें शत्रूची तिरपिट उडेल.

वर वर्णन केलेल्या विषम परिस्थितींत आपल्या हुलकावण्या व हालचालींमुळें शत्रूच्या चालींत व हालचालींत अनिश्चितता दिसून आली तर आपल्याला जय मिळण्याची आशा आहे असें मानावयास हरकत नाहीं. तसेंच आपल्या हुलकावण्यामुळें शत्रूच्या चालींत अनिश्चितता निर्माण झाली तर दिवसचें दिवस हुलकावण्यांत काढतां येतात व रात्रींच्या वेळीं हि खंदकबंदी करण्यास अवसर मिळतो. तसेंच असें करीत करीत चांगल्या जागीं माघार घेण्यास सवड हि मिळूं शकते.

अशा बेडरवृत्तिमुळें सेनापति आपल्या शस्त्रांचा व सैन्याचा मान राखूं शकतो व वाढवूं हि शकतो. सैन्याचा मान व गर्व राखणें व वाढविणें हा सैन्याच्या शक्तीचाच आवश्यक भाग आहे.

(२६)

बचावाची लढाई करीत असतां बचावाच्या लढाईचें चढाईच्या लढाईत रूपांतर करणें ही बाब अत्यंत नाजूक व अतीव कौशल्याची आहे.

(२७)

रणक्षेत्रांतील आपले वावरण्याचें मार्ग बदलूं नयेत हा सामान्य नियम आहे. पण युद्धपरिस्थितीमुळें ते केव्हां केव्हां बदलावे हि लागतात. असले मार्ग बदलण्यांस हि फार कौशल्य लागतें. कुशलतेनें वावरण्याचें मार्ग बदलल्यास शत्रु फसतो व त्याला आपली पिछाडी व हल्ला करण्या योग्य कमजोर ठिकाणें उमगत नाहींत.

(२८)

सैन्याजवळ वेढ्याला उपयोगी साधनांचा भारी आटाळा असेल, तसेंच जखमी व बिमार (आजारी) माणसांचा तांडा असेल अशावेळीं सैन्यानें स्वतःच्या तळाकडे शक्य तितक्या त्वरेनें व नजीकांतल्या नजीक रस्त्यानें जावें.

(२९)

सैन्याचा तळ टाकण्यांत सुद्धां शास्त्रीय दृष्टि आणि कौशल्य लागतें. तळ टाकण्याच्या जागींच लढाई होईल असें कल्पून तळाची मांडामांड लढाई करतां उपयोगांत येईल अशा व्यूहा-सारखीच करावयाची असते. तळावर तोफखाना ठेवावयाचा तो अशाच जागीं ठेवतात कीं अनपेक्षितपणें लढाई लागली तरी हि त्याचा ठेवल्या जागेवरून ताबडतोब उपयोग व्हावा. तळाची जागा शत्रूच्या माऱ्याच्या टप्प्यांत नसावी. शत्रूच्या बाजूनें न दिसेल अशी झांकलेली जागा तळासाठीं निवडावी. तसेंच शत्रु जागेला

बळसा घालून आपल्या बगलेवर हल्ला करूं शकणार नाहीं असा हि गुण त्या जागेंत असावा. आणि माऱ्याच्या दृष्टीनें आपल्या मधील व शत्रू मधील तमाम जागेवर आपली हुकमत गाजवतां येईल, मारा करतां येईल, अशी हि ती जागा असावी.

(३०)

आपण एखादी जागा जिंकली पण लगेच शत्रूनें ती घेरण्याचा प्रयत्न केला तर आपलें त्याक्षणींचें झाडून सारें बळ एकत्र जमवावें व चढाई करण्याच्या हालचाली करून शत्रूच्या मनांत भीति उत्पन्न होईल असें करावें. असें केल्यानें शत्रूला आपली तयारी जास्त आहे असें वाटतें व त्यामुळें आपल्याला घेरण्याचा प्रयत्न शत्रु सोडून देईल असा संभव असतो. शत्रूचें बळ आपल्या पेक्षां जास्त असल्यानें आपण मागें घेणें आवश्यक आहे असें आपल्याला वाटत असलें तरी हि वरील सारख्या हालचाली केल्यास आपल्या बलाचें आकलन शत्रूला होत नाहीं व त्यामुळें आपल्या माघार घेण्याच्या प्रसंगीं शत्रु स्वतःच्या सैन्याचा थोडा भाग आपल्या बगलांना त्रास देण्यासाठीं पाठवूं शकत नाहीं.

(३१)

सैन्याचा तळ टाकावयाचा तो शत्रूपासून पुष्कळच दूर टाकला पाहिजे. तळ टाकावयाचें ठिकाण अडोशाचें असावें व तो अडोसा असा असावा कीं त्यामुळें तळाचें संरक्षण होईल. शत्रु अचानक जर आपल्यापुढें येऊन उभा राहिला तर अशा

जागेचा फार उपयोग होतो, कारण शत्रूचा हल्ला सुरू होण्यापूर्वी (अडोशामुळें) आपलें सैन्य जमवायला पुरता वेळ मिळतो.

(३२)

अशी कल्पना करा कीं दोन सैन्यें एकमेकासमोर युद्ध करण्यासाठीं व्यूह रचून जैयत उभीं आहेत. एका सैन्याच्या पाठीमागें नदी आहे व नदीवर पूल पण आहे. दुसऱ्या सैन्याच्या मागें असला कांहीं अडथळा नाहीं, त्याच्या मागच्या सर्व दिशा अगदीं मोकळ्या आहेत. अशा वेळीं पहिल्या सैन्यास माघार घेण्याचा प्रसंग आला तर त्याचें अपरिमित नुकसान होईल, व दुसऱ्या सैन्यावर माघारीचा प्रसंग आला तर त्याची विशेष हानी होणार नाहीं. अशा परिस्थितींत पहिल्या प्रकारच्या सैन्याचा सेनापति विशेष हिकमतबाज असला तरच तो आपलें सैन्य निभावून नेऊं शकेल. पण त्यानें जयश्री मिळविण्यासाठींच धडपडलें पाहिजे; निधड्या छातीनें प्रतिपक्षाला जोराचा फटका मारून एकाच वेळीं शत्रूच्या दोन हि बगला व तोंडावर तडाखे देऊन कौशल्यपूर्ण हालचाली त्यानें केल्या तर विजयश्री निश्चयानें त्यालाच वरील.

(३३)

आपल्यासमोर सुसज्ज आणि ऐनजिनसी, एकवटलेलें सैन्य उभें आहे व तें स्वतःच्या मागें दळणवळण अगदीं सहजतेनें करूं शकतें व संदेशसुद्धां सुलभतेनें पाठवूं शकतें, अशी त्या सैन्याची

स्थिति आहे. आपल्याजवळ सैन्याचीं दोन दळें आहेत. समोरच्या सैन्यावर हल्ला दोन हि दळांनीं चढवला तर योग्य होईल अशी आपली स्थिति आहे. अशा वेळीं हल्ला चढविण्यापूर्वी आपल्या दोन हि दळांमध्यें दळणवळणाचे व संदेशाचे मार्ग नसले तर ते करून घेण्याची व्यवस्था आधीं केली पाहिजे. असले मार्ग नाहींत म्हणून दोन हि दळांना स्वतंत्रपणें वागावयास सांगून हल्ला चढविण्यास लावणें चुकीचें होईल. युद्धशास्त्राच्या नित्य तत्त्वाची ती पायमल्ली होईल.

(३४)

एखाद्या ठिकाणावरून आपल्याला शत्रूनें हुसकलें तर आपल्या सैनिकांच्या जमावांनीं वा गटांनीं पुनः एकत्रित होण्याचें ठिकाण आपण आधींच ठरविलेलें असावें. तें ठिकाण ठरवितांना तें शत्रूपासून अधिकांत अधिक दूर असेल असें निवडावें. असें दूरचें स्थळ निवडलें म्हणजे आपले जमाव आणि गट त्या ठिकाणावर एकूट होण्यापूर्वी शत्रु तेथें पोंचणार नाहीं. आपले जमाव एकत्र होण्यापूर्वी शत्रु आपण ठरविलेल्या ठिकाणीं पोंचला तर तो आपल्या गटांना एक एकटें गांठून त्यांचा निःपात करील व मग आपल्याला मोठ्या संकटाला तोंड देण्याची वेळ येईल.

(३५)

लढाईला तोंड लागण्याच्या आदल्यादिवशीं सैन्याचा कोणता हि भाग सैन्यापासून अलग करून युद्धक्षेत्राबाहेर पाठवूं नये. कारण युद्धाच्या आदल्या रात्रीं हि शत्रूच्या सैनिकी परिस्थि-

तींत अेकाअेकीं बदल होण्याचा संभव असतो. हा बदल शत्रूच्या दृष्टीनें बरा अगर वाईट असेल. वाईट बदल झाला तर शत्रु माघार घेईल, व तसल्या परिस्थितीला आपणाला तोंड द्यावें लागेल. आपल्या दृष्टीनें ही परिस्थिति वाईट नव्हें. शत्रु माघार घेत असतांना त्याची लांडगे तोड करणें शक्य असल्यास तितक्यापुरता आपल्या हालचालींत आपण फेरफार केला कीं बस्स. पण शत्रूच्या दृष्टीनें त्याच्या परिस्थितींत जर कां बऱ्यापैकीं बदल झाला, म्हणजे उदाहरणार्थ त्याला जास्त कुमक मिळून त्याची परिस्थिति ताबडतोबीचें आक्रमक युद्ध करण्या इतकी जर सुधारली तर तो आपणावर चढाई करील व सैन्य तोडून युद्ध-क्षेत्राबाहेर पाठविण्याचें कृत्य आपल्या कदाचित् आंगलटीस येऊन आपणास पस्तावण्याची पाळी यईल.

लढाई देण्यापूर्वी आपली सर्व शक्ति एकवटली पाहिजे. दिवसाच्या उद्दिष्ट वस्तुचा निर्णय केव्हां केव्हां एखाद्याच तुकडीच्या अथवा गटाच्या करामतीमुळें, शौर्य-धैर्यामुळें होतो. त्यामुळें आपल्याजवळ जें सैन्यबळ असेल त्यांतील प्रत्येक तुकडीला व गटाला काम नेमून दिलें पाहिजे. कोणी हि कामावाचून न राहील इकडे लक्ष पुरविलें पाहिजे.

(३६)

शत्रुसैन्य व्यवस्थित रीतीनें जागा दाबून बसलें असतांना त्याच्या देखत बगलांना कूच करायला लावणें युद्धशास्त्राच्या

तत्त्वांच्या विरुद्ध आहे. तसेंच शत्रुसैन्य ज्यावेळीं उंचावर असेल आणि त्याच उंचवट्याच्या पायथ्याजवळून आपल्याला आपलें सैन्य एकेरी अगर दुहेरी ओळ करून नेणें भाग असेल अशा वेळीं हि आपण बगली कूच करूं नये.

(३७)

निर्णायक लढाई खेळण्याचा आपला विचार असला तर यश मिळण्याचे जितके मोके साधतां येतील तेवढे साधून घ्यावेत. प्रतिस्पर्धी खंदा लढवय्या असेल तर मोका हुकविणें म्हणजे मार खाण्याची आपली आपण तयारी करण्यासारखें आहे. यश मिळविण्याचे आलेले मोके हुकले तर खंदा सेनानी आपलें पुरतें निकंदन करील. अशा वेळीं आपल्या गढी, कोटांचा अगर शस्त्रास्त्रांच्या कोठाराचा कांहीं उपयोग होणार नाहीं.

(३८)

आक्रमण संरक्षक पथकांचें काम पुढें चालून जाण्याचें अगर माघार घेण्याचें नसतें. त्यांचें मुख्य आणि महत्त्वाचें काम पूर्व-नियोजित आणि फसव्या हालचाली करण्याचें असतें. आक्रमण संरक्षक पथक नेहमीं सुटसुटींत घोडदळाचें असावें. त्याच्या मदती साठीं सुसज्ज घोडदळ राखून ठेवावें. तसेंच तोफखान्यासह पायद-ळाच्या तुकड्यांची हि आक्रमण संरक्षक पथकाला मदत मिळूं शकेल अशी योजना असावी. आक्रमण संरक्षक पथकांत अगदीं वेंचक माणसांची भरती करावी. अशा पथकांची कामगिरी काय व ती कशी पार पाडावयाची याची पुरती माहिती असलेला

सेनापति असल्या पथकावर नेमावा व त्याच्या हाताखालचे अधिकारी हि असल्या कामगिरींत तरबेज असतील असेच नेमावेत. पथकांतील सैनिकांना सुद्धां पथकाच्या कामगिरीचें पूर्ण शिक्षण दिलेलें असावें, कारण अशिक्षित माणसें गोंधळ आणि घोंटाळा करतील.

(३९)

एखाद्या खिंडींतून अथवा अरुंद वाटेवरून आपल्याला जावयाचें असलें आणि आपल्याजवळ भारी तोफखाना असला तर खिंडीचें पलीकडचें टोंक आपल्या पूर्णपणें कब्जांत असल्याखेरीज तोफखाना खिंडींत घालूं नये. कारण माघार घेण्याचा प्रसंग आला तर खिंडींतील तोफखान्यामुळें माघार घेतांना त्रास होईल, आपली तिरपिट उडेल व घोंटाळा होईल. खिंडींतून तोफखाना न्यावयाचा प्रसंग पडल्यास आधीं आपल्याकडील बाजूकडे योग्य जागेची निवड करून तेथें तोफखाना सुसज्ज ठेवावा, मग खिंडीच्या पलीकडच्या टोंकाचा ताबा घ्यावा व निर्वेध ताबा मिळाला म्हणजे तोफखाना हलवावा.

(४०)

लढाईचा पवित्रा घेतल्यावर आपल्या निरनिराळ्या सैन्यदळांमध्यें फाट अथवा खिंड न राहील अशी खबरदारी घेतली पाहिजे. तसें न केलें तर शत्रु आपल्या दोन दळांमध्यें पांचर मारील, अगर मारण्याचा प्रयत्न करील. मात्र शत्रुसैन्याला फस-

वून आपल्या जाळ्यांत ओढण्यासाठीं व तशी पुरती तयारी करून अशी फाट ठेवली तर हरकत नाहीं.

(४१)

एकाच सैन्याचे निरनिराळे गोट एकमेकाला मदत करूं शकतील अशा दृष्टीनें टाकावेत.

(४२)

आपल्या व शत्रूच्या मध्यें नदी आडवी आहे, शत्रूनें नदी-पार (आपल्या बाजूस) ठाणीं केलीं आहेत अशा वेळीं शत्रूवर समोरून हल्ला चढवूं नये. कारण अशा वेळीं नदीपारच्या ठाण्यां-वरून शत्रूनें एकाएकी झडप घातली तर आपलें सैन्य निरनिराळें फोडलें जाण्याचा संभव राहतो.

(४३)

नदी ओलांडावयाची असेल तर नदी जवळ समांतर रेषेंत दोन ओळी करून नदी एकामागून एक अशा रीतीनें एका ओळीनें ओलांडावी. शत्रूनें हल्ला चढविला तर अघाडीची ओळच काय ती हल्ल्यांत सांपडेल व बाकीचें सैन्य आपल्याला सांवरून घेतां येईल. नदी उतरतांना सुरवातीस सुटसुटीत सैन्य पुढें ठेवलें पाहिजे. झपाट्यानें हालचाली करण्यास सुटसुटींत सैन्यच उपयोगी पडतें. नदीवर पूल टाकून नदीपार होण्याची हालचाल अतीव झपाट्यानें केली पाहिजे. नदीवर टाकावयाचा

पूल शत्रूपासून दूर टाकला पाहिजे व सुरवातीपासून शेवटापर्यंत सर्व हालचाली शत्रूला फसवून, शत्रूला अंधारांत ठेवून केल्या पाहिजेत.

नदी उतरावयाची असली तर समोरच्या किनाऱ्यावर हुकमत गाजवितां येईल अशी उंचट जागा आपणांस सांपडली तर बरें असतें, आणि अशा जागीं तोफखाना गोठवितां आला तर देवच पावला. ही मारागिरी करतां येण्यासारखीं जागा नदीकांठापासून किती दूर असावी तें आपल्या तोफखान्याच्या व बंदुकांच्या पल्ल्यावर अवलंबून असणार. त्याबद्दल साधारण धोरण असें असावें कीं आपला तोफखाना व पैलतीर शत्रूच्या तोफखान्याच्या पल्ल्यांत नसावा. शत्रु पैलतीरावर तोफखान्याचा मारा करूं शकेल अशा जागीं असला तर नदी उतार होणें धोक्याचें असतें. आपल्या तोफखान्यानें शत्रूची दाणादाण उडवून तो गोंधळलेल्या स्थितींत असेंतोंपर्यंत आपण चटकन् नदी उतार होऊन पैलतीराला आपले पाय रोवलें पाहिजेत व शक्य तेवढीं बळकट नदीपार ठाणीं मांडलीं पाहिजेत. नदीचें पात्र मोठें असलें व त्यांत एखादें बेट असलें तर त्या बेटाचा हि नदीपार ठाण्यासारखा उपयोग करतां येतो. नदी उतरतांना मुख्य गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती ही कीं नदीपार जाणाऱ्या सैन्याला नदीपार होतांना व नदीपार झाल्यावर हि आपल्या तोफखान्याकडून संरक्षण मिळालें पाहिजे. तसेंच एखाद्या पुलावरून नदीपार जावयाचें असलें तर अरुंद वाटेवरून अगर खिंडींतून जातांना

जे उपाय योजावें लागतात. तसले उपाय व पूर्वतयारी करून पुलावरून आपलें सैन्य नेलें पाहिजे.

(४४)

पूल ठोकण्याची साधनसामुग्री बाळगणाऱ्या सैन्याला नदी उतरू न देणें कठिण असतें.

(४५)

नदी उतरणाऱ्या सैन्याला प्रतिकार करून नदी उतरूं न देण्यामागचा हेतु जर एकाद्या ठिकाणीं वेढा देऊन बसलेलें सैन्य आणि नदी उतरून येणारें सैन्य या मध्यें अडोसा करण्याचा असला आणि नदी उतरूं न देणें साधत नसलें तर अशा रीतीनें अडोसा करणाऱ्या सेनापतीनें आपलें सैन्य चट्कन मागें घ्यावें व उतरून येणाऱ्या सैन्याच्या व वेढा देऊन बसलेल्या आपल्या सैन्याच्या मधोमध मांडावें. अशी मांडणी शत्रु येण्यापूर्वीच सिद्ध केली पाहिजे.

नदी उतरून जाण्यासाठीं जीं नदीपार ठाणीं बांधावयाचीं असतात अगर तटबंदी ठाणीं करावीं लागतात तीं नदीच्या अगदीं कांठावर करावयाचीं नसतात. नदीकांठ व ठाणें यांच्या मध्यें सैन्य जमवितां येईल. इतकें तरी अंतर ठेवावें लागतें. असें अंतर ठेवलेलें असलें तर पीछेहाट करतांना घोंटाळा होत नाहीं. अंतर न ठेवल्यास पीछेहाट करणारें सैन्य नदीपार ठाण्यांत अगर तटबंदीच्या ठाण्यांत भरेल व तसें झालें तर आणखीनच घोंटाळा माजून

नदीपार ठाण्यांत अगर तटबंदीच्या ठाण्यांत परतणाऱ्या सैन्याच्या संरक्षणासाठीं म्हणून ठेवलेल्या सैन्याला स्वतःची कामगिरी बजावतां येणार नाहीं व त्यामुळें नदीपार ठाणें निरुपयोगी होईल.

(४६)

तटबंदी ठाण्याचा अथवा किल्ल्याचा उपयोग दोन हि प्रकारच्या म्हणजे चढाईच्या व बचावाच्या, लढाईंत सारखाच होतो. शत्रूचें आक्रमण, किल्ले एकाकीपणानें प्रतिरोधूं शकणार नाहींत हे जरी खरें असलें तरी किल्ल्यांत राहून शत्रूच्या आक्रमणाला खीळ घालतां येते, तें कमजोर करतां येतें. तसेंच शत्रूला किल्ल्यांत राहून त्रासवितां अथवा छळतां सुद्धां येते.

(४७)

वेढा यशस्वी करण्याचें दोन मार्ग आहेत. पहिला मार्ग म्हणजे वेढणाऱ्या सैन्याला थोपविण्यासाठीं ठेवलेल्या सैन्याला हालचालीच्या क्षेत्रांतून पिटाळून लावणें व बाकी राहिल्या साहिल्या सैन्यास नैसर्गिक अंतरायाच्या म्हणजे मोठ्या डोंगर नद्यांच्या पार हाकवून देणें. असें केल्यानंतर मात्र नैसर्गिक अंतरायापलिकडून कांहीं कुमक बिमक आल्यास तिचा समाचार घेण्यासाठीं टेहळें सैन्य ठेविलें पाहिजे. वेढलेली जागा सर होईपर्यंत तरी असें सैन्य ठेवलें पाहिजे.

(४८)

आपण वेढा घालून बसलेलें ठिकाण, किल्ला अगर गांव

लढाई न देतां जिंकावयाचें असेल तर आपणा जवळ वेढ्याचीं भरपूर साधनसामग्री, दारूगोटा व वेढा चालू राहील तितके दिवस पुरेल इतकें मालसामान व अन्नधान्य असणें आवश्यक आहे. तसेंच तेथील उंचवटे, जंगलें, जमिनीची वैशिष्ट्यें, दल-दलीच्या जागा, ओढे विगैरे गोष्टींचा आपण आपल्या हिताच्या दृष्टीनें जास्तींत जास्त उपयोग करून घेतला पाहिजे. तसेंच आपल्या भोंवतीं खंदकांचे अगर बुरुजांचे घेरे तयार करून शत्रूच्या व आपल्या मध्यें छाती इतपत उंचीचीं भिंताडें व ओटे तयार केलीं पाहिजेत.

(४९)

आपण वेढा देऊन बसलों असलों व आपणाजवळ वर सांगितलेलीं सर्व साधनें मुबलक असलीं म्हणजे आपलें पुरवठा केंद्राशीं दळण वळण नसलें तरी चालतें. वेढ्यांतील लोकांच्या मदतीला शत्रूचें दुसरें सैन्य आलेंच तर त्याला दाबून धरण्याचें तेवढें काम करावें लागतें. अशा साठीं टेहळें सैन्य तयार ठेवाव-याचें असतें व त्यानें वेढ्यांतील लोकांच्या मदतीला आलेल्या शत्रु-सैन्यास नजरे बाहेर जाऊन द्यावयाचें नसतें. वेढ्यांतील लोकांच्या मदतीला आलेल्या सैन्याच्या आंत जाण्याच्या सर्व वाटा रोकून दाबून ठेवाव्यात, व त्या सैन्याच्या पिछाडीवर व बगलांवर हल्ले करून त्याचें अवसान खचवावयाचा प्रयत्न करावा. इतकें हि करून त्या सैन्यानें आपल्याला चकविलें तर त्याच्याशीं लढाई देण्यास सुद्धां कमी करूं नये व आपण उभे केलेले खंदकांचे व

बुरुजांचे घेरे मजबूत असले तर वेढा देऊन बसलेल्या आपल्या सैन्यांतील कांहीं सैन्य हि या लढाईसाठीं जरूर असल्यास वापरावें.

(५०)

शत्रु सैन्याच्या टप्प्यांत व त्यांचा देखत वेढा देऊन बसणें असेल तर आपल्या भोंवतीं खंदकांचे व बुरुजांचे घेरे बांधणें व त्या आडोशानें आपलें सैन्य ठेवणें अत्यंत आवश्यक आहे.

(५१)

वेढा दिलेल्या ठिकाणाच्या रक्षणासाठीं ठेवलेल्या शिबंदीच्या चौपट सैन्य वेढ्यासाठीं पुरें असतें. आपल्या जवळचें सैन्याचा शिबंदीच्या चौपट होईल इतका भाग वेढ्यासाठीं ठेवून बाकी राहिलेलें आपलें सैन्य शत्रूच्या मदतीला येणाऱ्या सैन्याच्या इतकं असलें तर आपलें जास्ती असलेलें सैन्य एका दिवसाच्या चाली पेक्षां थोड्या अधिक अंतरावर दूर नेऊन ठेवण्यास हरकत नाहीं.

वेढा घातलेल्या ठिकाणाच्या रक्षणासाठीं ठेवलेल्या शिबंदी पेक्षां चार पट सैन्य वेढ्यासाठीं ठेवून आपलें सैन्य अधिक होत असलें पण असें अधिक असलेलें सैन्य वेढ्यांतील माणसांच्या मदतीस येणाऱ्या सैन्यापेक्षां कमीं असलें तर तें एक दिवसाच्या चाली पेक्षां जास्त अंतरावर ठेवूं नये. कारण आपल्यावर (वेढा देऊन बसलेल्या आपल्या सैन्यावर) हल्ला झाल्यास आपल्या मदतीला ते वेळेवर येऊं शकावें हा खरा हेतु आहे.

वेढा घालून बसलेलें सैन्य आणि टेहळें सैन्य मिळून वेढ्यांत

अडकलेल्या लोकांच्या मदतीस येणाऱ्या सैन्या इतकेंच आपलें सैन्य असेल तर वेढा यशस्वी करण्याचा प्रयत्न शक्य तितक्या जलदी केला पाहिजे.

(५२)

वेढा देऊन बसलेल्या सैन्याच्या रक्षणासाठीं आपल्या सैन्या भोंवतीं खंदकांचे व बुरजांचे जे घेरे तयार केलेले असतात त्यांच्या आंत राहून शत्रूची वाट पहात न बसतां घेऱ्यांच्या बाहेर पडून शत्रूच्या मदतीला येणाऱ्या सैन्यावर एकदम हल्ला करावा असें कांहींचें मत आहे. पण नेपोलिअनच्या मतें असें मत चुकीचें आहे. युद्धशास्त्राचा कोणताच नियम अगदीं नित्य न फिरणारा बदलणारा असा नसतो. त्यामुळें घेऱ्यामध्यें राहून शत्रु आपल्या जवळ येण्याची वाट पाहणें नेहमीच त्याज्य लेखण्या सारखें नाहीं.

(५३)

युद्ध-स्थापत्य अजून पूर्णत्वास गेलें नाहीं. तेव्हां वेढा देणाऱ्या सैन्यानें खंदकांच्या व बुरुजांच्या घेऱ्यांत बसून आपण सुखरूप आहोंत असें समजूं नये, आणि वेढा देणाऱ्या सैन्याच्या मदतीला पुरवणी सैन्य देण्यास केव्हां हि चुकूं नये. कारण असली मदत ठेवण्यानें केव्हां हि नुकसान तर होत नाहींच, बहुधा नेहमींच उपयोगी पडतें, व पुष्कळ वेळेला तें अत्यंत आवश्यक आहे असें वाटण्या इतका त्याचा उपयोग होतो.

(५४)

एखादा तटबंदीच्या शहरांत सैनिकी रुग्णालय आहे आणि

कोठार हि आहे तेव्हां त्याचें संरक्षण करणें तर आवश्यक आहे, पण त्याचें संरक्षणास पुरेशी शिबंदी ठेवता येण्यासारखी परिस्थिति नाहीं. अशा वेळीं काय करावें असा प्रश्न उद्भवतो, त्याला उत्तर असेंच देतां येईल कीं शत्रूच्या एखाद्या जोरकस हल्ल्यानें सहजासहजीं शहर पडणार नाहीं इतपत शिबंदी अशा शहरांत ठेवावी.

(२५)

तटबंदीची जागा शिबंदीचें रक्षण करूं शकतें तसेंच किल्ल्यांच्या आधारानें शत्रूची गति हि आपणांस मंद करता येतें अगर शत्रूस थोपवून हि धरतां येतें. पण तें कांहीं थोड्या अवधींसाठींच शक्य होतें. ही वेळ निघून गेली व संरक्षणाचीं साधनें उध्वस्त झालीं म्हणजे शिबंदीनें आपलीं शस्त्रास्त्रें खालीं ठेवणें बरें. सर्वच सुधारलेलीं राष्ट्र् या मताची आहेत. मतभेद आहे तो शरणागति पूर्वी उणा कीं अधिक प्रतिकार करवा त्याबद्दल आहे.

परंतु कांहींचें म्हणणें असें आहे कीं शरणागति ही केव्हां हि वाईटच. शरण जाण्यासारखी परिस्थिति जर उत्पन्न झाली तर अगदीं शेवटचा उपाय म्हणून सर्व तटबंदी सुरुंग लावून उडवून द्यावी व रात्रींच्या वेळीं तुफान वेगानें वेढा देणाऱ्या सैन्यांतून वाट कापत निघून जावें. तटबंदी उडविणें शक्य झालें नाहीं तरी हि शत्रूला कापीत निघून जाणें शक्य असतें आणि असें केल्यास शिल्लक शिबंदी पैकीं निदान तीन चतुर्थांश माणसें तरी पुनः आपल्या लोकांत येऊन मिळूं शकतात.

(५६)

तटबंद जागेच्या किंवा किल्ल्याच्या निकरानें लढलेल्या शिबंदीकडून शिबंदीस सुरक्षित जाऊं दिलें तर जागा सोंपून देतो असें बोलणें सुरू झालें तर तें ताबडतोब मान्य करण्यास हरकत नाहीं. ज्या शिबंदीनें प्राणपणानें असल्या जागेचें रक्षण केलें असेल त्यांना शरणागतिसाठीं सन्मानकारक अटी देणें युक्त होईल. कारण अशावेळीं स्थळ हट्टानें घेण्याचा प्रयत्न करणें धोक्याचें असतें, आणि तटबंदीची जागा अगर किल्ला चांगल्या स्थितींत हातात पडणें फायद्याचें असतें.

(५७)

पायदळ, घोडदळ, आणि तोफखाना हीं सैन्याचीं अंगें एकमेकाला पूरक आहेत. या तिघावांचून सैन्य पुरें होऊं शकत नाहीं, त्यामुळें यापैकीं कुठलें हि अंग कमी करणें युक्त नाहीं. तळा-वर अगर चालतांना किंवा युद्धाची तयारी करतांना हीं अंगें एकमेकांना उपयोगी पडूं शकतील आणि मदत करूं शकतील अशा रीतीनें त्याची मांडणी करावी.

(५८)

लढाई करण्यासाठीं पायदळ गोठवावयाचें असलें तर तें दोन ओळींत गोठवावें. दोहोंपेक्षां जास्त ओळी केल्या तर बंदु-कांचा परिणामाच्या दृष्टीनें एक सारखा उपयोग करतां येत नाहीं. तिसऱ्या ओळींतून सोडलेल्या बंदुकांची मारगिरी परिणाम

कारक होत नाहीं व पुढील दोन रांगांना त्या पासून अपाय होण्याचा हि संभव असतो.

वरील प्रमाणें दोन रांगांत पायदळ उभें केलें व तिसरी ओळ मारगिरीच्या दृष्टीनें करणें इष्ट नसलें तरी हि पुढील दोन ओळींतील जायबंदांच्या जागा घेण्यासाठीं दर नऊ माणसागणीक एक अगर दर दुसऱ्या यार्डावर एक माणूस ठेवून तिसरी ओळ करणें आवश्यक आहे. अशा तऱ्हेनें उभें केलेल्या माणसानें पुढील दोन ओळींतील जायबंद माणसांची जागा घ्यावयाची असते पण मुख्यत्वें अशी जागा घेण्याची वेळ येण्यापूर्वी पडेल तें काम करण्याचें असतें. म्हणून अशा माणसाला हरकाम्या हि म्हणतात.

(५९)

घोडदळ व पायदळाच्या तुकड्या एकमेकांत मिसळूं नयेत. अशा तऱ्हेनें घोडदळ पायदळ एकत्र केल्यास त्यापासून अडचणी उद्भवतात. पायदळाच्या तुकड्यांमुळें घोडदळाच्या जलद गतिवर परिणाम होतो. घोडदळाच्या सर्वच हालचालींना त्यामुळें पायबंद घातल्यासारखें होतें. घोडदळाच्या तुकडीला एकटेंच हालविलें तर पायदळ उघडें पडतें. घोडदळाला सर्वोत्कृष्ट मदत त्याच्या बगला संभाळल्यानें होते.

(६०)

युद्धाच्या सुरवातीला, युद्धाच्यामध्यें, आणि युद्धाच्या शेवटीं घोडदळाची गर्दी उपयोगी पडते. घोडदळानें असलें हल्ले शत्रूच्या

पायदळ सैन्याच्या बगलांवर करावयाचे असतात. पायदळ सैन्य ज्या वेळीं स्वतःच्या अघाडीचे बाजूनें लढत असेल त्यावेळीं तर घोडदळानें त्याच्या बगलांवर केलेली गर्दी विशेष परिणामकारक ठरते.

(६१)

जय मिळविल्या नंतर तो टिकवून ठेवण्याचें काम व पराभूत शत्रूला पुनः एकत्र न होऊं देण्याचें काम घोडदळाचें आहे.

(६२)

तोफखान्याची गरज पायदळापेक्षां घोडदळाला अधिक भासते. कारण घोडदळ आग वर्षू शकत नाहीं. घोडदळ हातघाईची लढाईच काय ती करूं शकतें. ही उणीव भरून काढण्यासाठींच घोडदळाबरोबर तोफखाना असावा लागतो. तसेंच घोडदळाच्या बरोबर तोफखाना राहावा म्हणून तोफखान्याचे गाडे घोड्यांकडून ओढण्यात येतात. घोडदळ हल्ला चढवीत असो, विश्रांति घेत असो अगर शत्रूनें विखुरल्यानंतर पुनः एकत्र होत असो अशा दरेक वेळीं तोफखान्याचें सहाय्य घोडदळाला अवश्य हवें.

(६३)

तोफखान्याचा मुख्य भाग घोडदळ व पायदळाबरोबर असावा. बाकीचा भाग राखीव तोफखाना म्हणून योग्य वेळीं उपयोगांत आणण्यासाठीं सज्ज ठेवावा. सैन्य मजला मारीत असो अगर लढाईच्या पवित्र्यांत असो तोफखान्याची व्यवस्था ही अशी असावी.

प्रत्येक तोफे गणीक दारूचीं तीनशें बारुदें व तीनशे गोळे असावेत. (ही सामग्री तोफेबरोबरच्या दारूगोळ्याच्या पेटींतील दारूगोळ्यां उपरांत समजावयाची आहे.) येवढ्या सामानावर दोन लढाया करतां येतील.

(६४)

माझ्याच्या दृष्टीनें अधिकांत अधिक चांगल्या ठिकाणीं तोफखाना मांडावा. तसेंच घोडदळ आणि पायदळ यांच्या पासून शक्य तितक्या दूर ठेवावा. पण असें करतांना तोफखान्यावरच अरिष्ट कोसळणार नाहीं या विषयीं खबरदारी घ्यावी. तोफांच्या डावीकडे अगर उजवीकडे पडदपोशीं ठेवूं नये. त्यांचा मारा सर्व बाजूस अनिरुद्धपणें होऊं शकेल अशा स्थितींत तोफा ठेवाव्यात.

(६५)

सैनिकांची गरज भागेल इतकें दाणागोट्याचें व घासदाण्याचें कोठार असेल तर त्याचाच उपयोग करावा. अशा वेळीं घरां घरांतून खाना घेण्यास सैनिकांस परवानगी देऊं नये.

(६६)

चांगला सेनापति, चांगले अधिकारी, चांगली संघटना, चांगलें शिक्षण व तालीम, आणि कडक शिस्त असली म्हणजे सैन्य लढाऊ दृष्टीनें चांगलेंच असतें. त्याला लढाऊ बनविण्यास आगंतुक कारण उत्पन्न करावें लागत नाहीं. असें असलें तरी हि तरुण सैनिकांच्या मनांत देशप्रेम, राष्ट्रांच्या यशोगौरवांत व कीर्तींत

भर टाकण्याची इच्छा या सारख्या भावना चेततील असा प्रयत्न केला तर त्यांच्यांत नवा उत्साह निर्माण होऊन त्या पासून फायदाच होईल.

(६७)

सैनिकी संघटनेची योजना आणि तंत्र तसेंच उत्तम शिक्षण घेतलेला थोडाबहुत अधिकारी वर्ग नसला तर कोणतें हि राष्ट्र सैन्य उभारूं शकणार नाहीं.

(६८)

सतत श्रम करण्याची संवय व दुस्तर अडचणींना तोंड देण्याची शक्ति हे प्रत्येक सैनिकाचे मुख्य आणि आवश्यक गुण आहेत. धैर्य हा मात्र सैनिकाचा दुय्यम गुण आहे. दारिद्र्य, दुःख (क्लेश) आणि स्वतःच्या गरजा न भागवितां येण्यासारखी परिस्थिति ह्या शिपायाच्या शाळा आहेत.

(६९)

बंदूक, काडतुसाची पेटी, पडशी, कमींतकमी चार दिवसांचें पाथेय आणि छोटासा परशु या पांच वस्तु सैनिकाबरोबर नेहमीं हव्यातच. वाटल्यास पडशी लहानांत लहान करावी, पण पडशी वांचून सैनिकाला राहूं देऊं नये.

(७०)

सैनिक आपल्या नोकरींत स्वेच्छेनें चालू राहील असें प्रयत्न

केलें पाहिजेत. त्यासाठीं सैनिकांना नेहमीं उत्तेजन दिलें पाहिजे. जुन्या सैनिकांविषयीं आवड व प्रेम दाखविल्यास हा हेतु सहज साध्य होऊं शकतो. नोकरीच्या वर्षांच्या प्रमाणांत सैनिकांच्या पगारांत वाढ हि केली पाहिजे. जुन्या मुरलेल्या सैनिकांना व नव्या भरतीच्या सैनिकांना एकसारखा पगार देणें अन्यायाचें आहे.

(७१)

लढाई खेळण्यापूर्वीं उत्तेजक भाषणें केल्यानें सैनिक शौर्य गाजवितील ही आशा व्यर्थ आहे. मुरलेले सैनिक असलीं भाषणें एका कानानें ऐकून दुसऱ्या कानानें सोडून देतात आणि नव्या भरतीचे सैनिक तोफेच्या पहिल्याच गर्जनेनंतर सर्व भाषणें विसरतात.

(७२)

भाषणांचा व वादविवादांचा उपयोग मोहीम चालू असतांना उठणाऱ्या खोट्या कंड्या नाबूद करण्यासाठीं, बेदिलीचीं कारणें शोधून काढून तीं दूर करण्यासाठीं, तळावर योग्य उत्साह व वातावरण राखण्यासाठीं, व रात्रींच्या पहारे, चौक्यांतील गप्पा टप्पांना योग्य विषय पुरविण्यासाठीं होतो. हे सर्व उद्देश छापील दैनिक आज्ञापत्रानें हि साधतात.

(७३)

तंबूत मुक्काम करणें प्रकृतीला अपायकारक असतें. सैनिकांच्या दृष्टीनें गटा गटानें शेकोट्या पेटवून उघड्यावर राहणें

चांगलें. तळाची जमीन नेहमींच कोरडी असत नाहीं. शिवाय मातींत वाळवी नसेलच अशी हि खात्री नसतें. ओलसर जमीन व वाळवी व त्यासारखे इतर जंतु, कृमि, कीटक यांपासून सैनिकांना त्रास होतो. शेकोट्या केल्या म्हणजे खालची जमीन हि वाळतें, जंतु वगैरे नाहींसे होण्यास मदत होते व शेकोट्यांच्या उबेमुळें आंथरूण पांघरूण हि बेताचेच लागते, व थंडीवाऱ्यापासून हि रक्षण होतें.

(७४)

पण तंबूतील राहणी अपायकारक असली तरी हि सैन्याच्या नेत्यांनीं मात्र तंबू डेरे देऊनच राहणें श्रेयस्कर असतें. त्यांना लेखन करावें लागतें, नकाशें पाहावें लागतात व इतर हि पुष्कळ लहान मोठीं कामें करावयाचीं असतात. तेव्हां मोठमोठ्या अधिकाऱ्यांना राहण्यासाठीं तंबूच द्यावेत. तसेंच त्यांना केव्हां हि कुणाच्या घरांत राहूं देऊं नये.

(७५)

शिवाय सर्वच सैन्याला उतरण्याला तंबू दिलें तर त्यामुळें तळाची जागा शत्रूपक्षास ताबडतोब कळते, व आपल्या सैन्याचें एकंदर बळ किती आहे याचें हि शत्रूला आकलन होतें. पण दोन तीन ओळींत गटा गटानें शेकोट्या करून पडलें तर आपल्या सैन्याचा शत्रूला अंदाज बांधता येणार नाहीं. कारण शत्रूला शेको-ट्यांचा धूरच काय तो दिसतो आणि नुसत्या धुरावरून सैन्याच्या

बळाचा अंदाज बांधणें कठिण असतें. शिवाय हवेंतील बदलामुळें धुरकट आणि धुकट हवा दिसतें. तेव्हां शेकोट्यांचा धूर कां हवेतला धूर असा प्रश्न पाडण्याचा हि संभव असतो. धुरावरून शेकोट्या मोजतां येणार नाहींत.

(७६)

युद्धकैद्या कडून मिळालेल्या माहितीची योग्य शहानिशा केली पाहिजे. साध्या शिपाई गड्याला स्वतःच्या तुकडी बाहेर काय होत असतें तें समजण्याला मार्ग नसतो. कारण तो आपल्या तुकडीच्या बाहेर क्वचित्च फिरकतो व चौकशी करतो. युद्धकैदी एखादा अधिकारी असला तर त्याची तुकडी ज्या सैन्य विभागांत असेल त्या सैन्य विभागाची त्याला माहिती असते व तो त्या सैन्य विभागाच्या नेमक्या स्थळाविषयीं व हालचाली विषयीं माहिती देऊं शकतो. युद्धकैद्यांनीं सांगितलेल्या माहितीवरूनच मात्र कोणते हि बेत आंखू नयेत. त्यांनीं दिलेली माहिती एकदम खरी अगर खोटी मानूं नये. आपल्या आघाडीच्या तुकड्यांनीं मिळविलेली माहिती व युद्धकैद्यांनीं दिलेली माहिती पडताळून पहावी. त्यांची माहिती एकेमकांस पुष्टिकारक असली तरच तिला महत्व असतें.

(७७)

युद्धांत कांहीं महत्त्वाची बाब असेल तर ती एकसूत्री नेतृत्व असणें ही आहे. म्हणून ज्यावेळीं अेकाच शत्रूशीं लढाई

द्यावयाची असेल त्यावेळीं सेनापती एकच असावा, सैन्य एकच असावें, व युद्ध धोरण हि एकच असावें.

(७८)

वादविवादांचा, युद्धमंडळांच्या बैठकींचा आणि तसल्याच ऊहापोहांचा उपयोग पूर्वी होत असे तसाच आज हि होईल. अशा वादविवादाअंतीं अति दूरदर्शी व शहाणपणाचे उपाय निश्चित होतील व अमलांत आणण्यांत येतील आणि अशा तऱ्हेच्या योजना पूर्वीप्रमाणेंच आतां हि वाईटांत वाईट आहेत असें अनुभवानें ठरेल. खरें पाहिलें तर युद्ध जिंकावयाच्या योजना आणि अमल हीं युद्धनेत्यानें करावयाचीं असतात व त्यांतच सेनापतीचें शहाणपण सांठविलेलें असतें. येवढ्यासाठींच खंबीर मनाचा, त्वरित निर्णय घेणारा, व घेतलेला निर्णय तितक्याच खंबीरपणानें आणि धडाक्यानें अमलांत आणणारा सेनापति असावा लागतो.

(७९)

युद्धांत अशा कांहीं गोष्टी उद्भवतात कीं ज्यांचें महत्त्व सेनापतीच जाणूं शकतो; अशा गोष्टींचें वा अाडचणींचें निरसन सेनापती कणखर व कार्यक्षम असल्या वांचून होऊं शकत नाहीं.

(८०)

शरण जाण्याची परवानगी फक्त किल्ला अगर तटबंदीच्या शिबंदीला असावी आणि ती हि त्यांनीं जागेच्या संरक्षणाची शर्थ

केल्यानंतर. त्याशिवाय कोणत्या हि सेनापतीला अगर अधिकाऱ्याला शरण जाऊन शस्त्रें खालीं ठेवण्याची परवानगी वा अधिकार कोठल्या हि परिस्थितींत वा केव्हां हि देऊं नयेत. शरण जाण्याची परवानगी सर्वांनाच असली तर त्यामुळें भयंकर परिणाम होतील. भीरु, अनुत्साही माणसें, वाहवलेलीं अगर अल्पज्ञ पण शूर माणसें शत्रु दिसला कीं भरामर शस्त्रें खालीं ठेवतील व त्याचा परिणाम सैन्याच्या हिंमतीवर होईल, राष्ट्राचा युद्धोत्साह खची होईल. असाधारण परिस्थिति ताळ्यावर आणण्याला असाधारण निश्चय व खंबीरपणा लागतो. अशा परिस्थितींत प्रतिकार जितका अधिक चिवट आणि तिखट तितका यशाचा मार्ग हि निकट असतो. चिवटाईनें प्रतिकार करून वेळ मारून नेली तर तितक्या काळांत मदत येऊन पोंचण्याचा हि संभव असतो अगर चिवट व तिखट प्रतिकारामुळें निसटून जाण्यासाठीं रस्ता मोकळा होण्याचा हि संभव असतो. मृत्युला वरण्याशिवाय दुसरा मार्गच शिल्लक नसलेल्या खंबीर मर्दांनीं सकृद्दर्शनी अशक्य वाटणाऱ्या गोष्टी हि करून दाखविल्या आहेत.

(८१)

स्वतःला लाभकारक, स्वतःच्या हातांखालील लोकांना फायदेशीर, पण स्वपक्षाच्या इतर सैन्याच्या हिता विरुद्ध अटींना संमति देऊन रणक्षेत्रावर शरण जाण्याची परवानगी कोठल्या हि अधिकाऱ्यास देऊं नये. अशी परवानगी दिलेली असली तर कोठला हि राजा, कोणतें हि राष्ट्र, कोठले हि लोक व कोठला हि सेना-

पति सुरक्षित आणि निर्धास्त राहणार नाहीं, नव्हें बुडेलच. स्वतः संकटांतून सुटायचें व स्वतःच्या सहकाऱ्यांना अधिकतर भयंकर परिस्थितींत लोटायचें याहून अधिक मोठा नीचपणा दुसरा नसेल. अशा वर्तणुकीस बंदी केली पाहिजे, व अशा तऱ्हेनें वागणारास जीवें मारण्या शिवाय दुसरी कसली हि शिक्षा केली न पाहिजे. सेनापति, अधिकारी व सैनिक ज्यांनीं शरण जाऊन स्वतःचें जीव वांचविले असतील त्यांचीं डोकीं मारलीं पाहिजेत. शरण जाण्याचा हेतु धरून जो अधिकार स्वीकारतो आणि अशा माणसाची जे आज्ञा मानतात ते दोघे हि एकाच दर्जाचे देशद्रोही आहेत. त्यांच्या योग्य शिक्षा म्हणजे मरणाचीच.

युद्धकैदी होण्याचा राजमार्ग, सन्मार्ग, निर्दोष मार्ग एकच; अगदीं स्वतंत्रपणें कैद झाले जाण्याचा, व स्वतःच्या शस्त्राचा उपयोग करणें अशक्य होईल अशा वेळींच धरलें जाऊन कैद पकडलें जाण्याचा. अशा परिस्थितींत कैद झाल्यावर कांहींच अटी असूं शकत नाहींत. शिवाय अटी व मान ह्या दोन वस्तु कधींच एकत्र बसणार नाहींत.

(८२)

जित देशांत जेत्या सेनापतीनें कसें वागलें पाहिजे हा अगदीं कठिण प्रश्न आहे. त्याच्यासमोर अडचणींचे डोंगर उभे असतात. सेनापति कडक वागला तर त्याच्या शत्रूंच्या संख्येंत भर पडते, ते दांतओठ खाऊं लागतात. तो जर मवाळपणानें वागला तर

त्यांच्या मनांत वेगवेगळ्या आशा आकांक्षा उत्पन्न होतात पण त्या पूर्ण करणें शक्य नसतें. जित देशांत दंगे, पुंडावें, बंडें दाबून टाकण्यांस, अगर होऊ न देण्यांत अनुक्रमें कडकपणा, न्याय व मार्दव कशीं वापरावींत तें विजेत्या सेनापतीला समजलें पाहिजे.

(८३)

स्वराष्ट्राच्या सेवेंत असतांना राष्ट्राच्या बलाबला विषयीं, राष्ट्रांतील एकंदर परिस्थितीं विषयीं, राष्ट्रांतील संरक्षण दृष्टीनें अभेद्य अशा स्थळांविषयीं मिळालेलीं माहिती शत्रुराष्ट्रास पुरविणें या सारखें अघोर पाप नाहीं. धार्मिक दृष्टिनें, नैतिक दृष्टीनें, कोठल्या हि दृष्टीनें पाहतां या गुन्ह्या इतका भयंकर कोणता हि गुन्हा नसेल.

(८४)

सर सेनापतीला स्वतःच्या चुका दुसऱ्याच्या माथीं मारून सुटतां येणार नाहीं. त्याची चूक झाली तर ती राजाच्या अगर प्रधानाच्या हुकमा प्रमाणें वागल्यामुळें झाली असें हि त्याला सांगतां येणार नाहीं. कारण राजा अगर प्रधान स्थळांवर नसतात, त्यांना स्थळावरील प्रत्यक्ष परिस्थितीची थोडीशीच माहिती असते, अगर बिलकुल माहिती नसते; अशा वेळीं त्यांनीं दिलेल्या हुकमा-प्रमाणें वागण्यांत धोका आहे असें सेनापतीचें मत झालें तर त्या हुकमा प्रमाणें वागण्यास तो बांधलेला नाहीं. सदोष योजना अमलांत आणण्याची जबाबदारी जो सेनापति अंगावर घेतो तो

दोषपात्र समजला पाहिजे. सदोषयोजना अमलांत आणण्याचा ज्या सेनापतीला हुकुम झाला असेल त्यानें आपली त्या योजने-विरुद्धचीं कारणें कळवावींत, योजना बदलण्याचा आग्रह धरावा, व इतकें हि करून त्याचें म्हणणें मानण्यांत न आलें तर त्यानें आपल्या कामगिरीचें त्यागपत्र द्यावें, पण ज्या योजनेनें सैन्याचा नक्की नाश होईल अशी त्याची खात्री झाली असेल ती योजना त्यानें कोठल्या हि कारणानें पार पाडूं नये.

(८५)

लढाई दिल्यास पराभव नक्की होणार अशी खात्री झाली असतांना आपल्या वरिष्ठाच्या आज्ञेप्रमाणें जो सर सेनापति लढाई देतो तो हि शिक्षार्ह आहे. अशा वेळीं त्यानें आज्ञा मानण्याचें साफ नाकारावें. मात्र वरिष्ट अधिकारी लढाईच्या जागीं उपस्थित असेल आणि हुकुम सोडील तर तेवढे सेनापतीने बिन-तकरार मानावयाचे असतात व अशा वेळीं वरिष्ठ अधिकारी जागेवर असल्यानें योजनेमध्यें वा हुकमामध्यें कांहीं दोष असलें तर ते त्याला सांगतां येतात व मग तो (वरिष्ठ) त्यांचा खुलासा हि करूं शकतो विचार विनिमयानें योजना निर्दोष करण्यास वाव असतो.

(८६)

विजयश्री आपल्या गळ्यांत माळ घालण्याच्या तयारींत आहे आणि त्याच घटकेला शरण जाण्याची राजाज्ञा आपल्या हातांत

पडली तर ती मानावीं कीं कसें? याला उत्तर एकच कधीं हि मानूं नये. असा हुकुम आयत्यावेळीं कां देण्यांत आला, त्याची उपयुक्तता काय, या गोष्टी सेनापति अजमावुं शकला तर असा हुकुम मानण्यास हरकत नाहीं. एरवी हुकुम मानण्याचें साफ नाकारावें.

(८७)

थंड मिजास व शांत डोकें हे सर सेनापतीच्या आवश्यक गुणांपैकीं गुण आहेत. अशा तऱ्हेचा सेनापति असला तर त्याला, वस्तु असतील तशा त्यांच्या खऱ्या स्वरूपांत दिसतील व त्याच्या अन्योन्य संबंधाचें वास्तविक मूल्य मापन त्याला करतां येईल. त्याचें मन इतकें निर्विकार असावें कीं बऱ्या आणि वाईट बातम्यांचा त्याच्या मनावर जरासुद्धां परिणाम होणार नाहीं.

(८८)

निरनिराळ्या लोकांनीं आणलेल्या बातम्या ऐकून व स्वतःस दिसलेल्या गोष्टी पाहून सेनाधिपाच्या मनांत एकामागून एक अगर एकाच वेळीं अनेक ठसे उमटतील त्यांचें त्यानें मनांतल्या मनांतच वर्गीकरण करावें, त्यांचें मूल्यमापन करावें, एक दुसऱ्याशीं ताडून पहावें, असें केल्यानें आपोआप त्यांची कारण परंपरा त्याच्या ध्यानांत येईल व त्याला योग्य निर्णय हि आपोआप सुचेल.

(८९)

कांहीं लोकांची शारीरिक व मानसिक प्रकृति अशी असतें

कीं त्यांच्या मनावर उमटलेल्या ठशांना ते कल्पनेच्या भराऱ्यांनीं रंगवितात व नटवितात; अशीं माणसें बुद्धि, चातुर्य, शौर्य, धैर्य व इतर हि आणखी पुष्कळ गुणांनीं युक्त असलीं तरी तीं सेनानेतृत्वाला नालायक ठरतात. अशांना युद्धाचें नेतृत्व तर कधीं हि देऊं नये.

(९०)

कार्यदर्शी सेनापति नांवाचा जो सेनाधिकारी असतो त्याला देश देशांच्या राजकीय व आर्थिक भूगोलाची, भूपृष्ठांची चांगलीच माहिती असली पाहिजे, टेहळणी करण्यांत तो कुशल असला पाहिजे, निरनिराळ्या ठिकाणीं व निरनिराळ्या लोकांकडे हुकुम धाडण्यांत येतात त्यांकडे त्याची नीट नजर असली पाहिजे, अगदीं क्लिष्ट समजल्या जाणाऱ्या हालचाली साध्या आणि सरळपणानें विनासायास त्याला करतां आल्या पाहिजेत व सेनापतीला आवश्यक समजले जाणारे सर्वच गुण त्याच्यांत असावयास पाहिजेत.

(९१)

तोफखान्यावरील सेनापतीला सैन्याच्या सर्व हालचालींची व डावपेचांची माहिती असली पाहिजे. कारण निरनिराळ्या सैन्यविभागांना दारूगोळा पुरविण्याचें त्याचें काम असतें.

(९२)

अघाडीच्या पथकांवरील सेनापतींचें काम बनेल तितक्या

त्वरेनें अरुंद निरुंद वाटा, खिंडी, पाण उतार, आडोशे, वगैरेंची पाहणी करणें; विश्वसनीय वाटाडे मिळविणें; गांवचे पाटील, कुळकर्णी, पोस्टमास्तर यांसारख्यांशीं संधान बांधून विचारपूस करणें; त्या त्या भागांतील रहिवाशांची समजूत काढणें; हेर पाठविणें; टपालांतील पत्रें पकडणें; त्यांचीं भाषांतरें करून घेऊन त्यांतील मजकुरांचें सार काढणें; व सर सेनापतीच्या प्रत्येक चौकशीस तो ससैन्य तेथें आला म्हणजे उत्तरें देणें; असें व असल्याच प्रकारचें असतें.

(९३)

युद्धाच्या सर्व अंगोपांगांची माहिती, अनुभव आणि प्रतिभा सर सेनापतीच्या अंगीं असलीं पाहिजेत. हालचाली, डावपेंच, कार्यकारणांची संतति व संगति, युद्धस्थापत्य, निरनिराळ्या कारखान्यांवरील सेनापतींच्या कामाची माहिती, ग्रंथ वाचनानें व पठणानें होऊं शकते. पण सेनापतीचें काम अनुभव, मातबर सेनानींनीं केलेल्या मोहिमांचा अभ्यास व प्रतिभा यांच्या मदती शिवाय करतां येत नाहीं, आणि या सर्व गोष्टीं अभ्यासानें प्राप्त होऊं शकतात. गुस्टाव्हस ॲडोल्फस, तुरीन, फ्रेडरिक, अलेक्झांडर, हॅनिबॉल, सीझर या सर्व जणांनीं एकाच प्रकारचीं तत्त्वें अवलंबिलीं होती. सैन्याची एकजूट टेवणें, कुठलें हि ठिकाण निर्बल न राहूं देणें, महत्त्वाच्या ठिकाणावर त्वरेनें चालून जाऊन तें घेणें, हींच तीं तत्त्वें होत. या बरहुकूम वागलें तर जयश्री नक्की वरते.

अलेक्झांडर, सीझर, हॅनिबॉल, यूजेन, गुस्टाव्हस, तुरीन, फ्रेडरिक यांच्या मोहिमा वर्णन करणाऱ्या पुस्तकांचीं पारायणें करावींत. त्यांना तुमचे आदर्श बनवा. मोठा सेनानी व्हायला, युद्ध कौशल्य अंगीं मुरायला, तसेंच युद्धशास्त्रांतील मख्खी कळायला वर सांगितल्याप्रमाणें पारायणें करणें हा एकच मार्ग आहे. त्यामुळें प्रतिभावान सेनापतीला अभ्यासाची जोड मिळेल व प्रतिभा अधिक कार्यक्षम व बलवान् होईल. मग या महारथींनीं घालून दिलेल्या युद्धशास्त्राच्या यमनियमा वांचूनची इतर तत्त्वें त्याज्यच ठरतील.

सर सेनापति बेहिशेबी असून भागणार नाहीं. स्वतःची साधनसामुग्री व स्वतः काय केलें पाहिजे याचा हिशेबी अंदाज त्यानें बांधला पाहिजे. समोरच्याची साधन सामग्री लक्षांत घेऊन तो आपल्या मार्गांत काय काय अडचणी उभ्या करूं शकेल आणि त्यांचें निवारण करण्यास आपणाजवळ पुरतें साधन आहे काय त्याचा हि सर सेनापतीनें विचार केला पाहिजे. आणि एकदां सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन निर्णय केला कीं, प्रतिपक्षाची प्रत्येक गोष्ट हाणून पाडण्यासाठीं त्यानें सर्व कांहीं उपाय योजलें पाहिजेत.

(९४)

अघाडीच्या व पिछाडीच्या फौजेच्या सेनापतींचें कौशल्य स्वतःवर कोठल्या हि तऱ्हेनें संकट ओढवून न घेतां शत्रूला थोपवून धरण्यांत व त्याच्या चाली लवकर न होऊं देण्यांत असतें. एक

एक मैल चालून जाण्याला चार पांच तास लागतील असें त्यानें केले पाहिजे. हें करण्याला हिकमती लढविण्याचें ज्ञान आवश्यक आहे. दुसऱ्या कुठल्या हि जागेवरील सेनापति पेक्षां घोडदळाच्या, अघाडीच्या फौजेच्या व पिछाडीच्या फौजेच्या सेनापतींना हिकमती लढविण्याच्या ज्ञानाची अधिक आवश्यकता असते.

(९५)

रणधुरंधर सेनापतीच्या अंगीं आवश्यक असणारे सर्व गुण एकाच व्यक्तिमध्यें सांपडणें फार कठिण आहे. असला माणूस विरळाच. बुद्धि, कर्तृत्व, शांत स्वभाव, शील, शौर्य, धैर्य हे गुण समप्रमाणांत ज्याच्या अंगीं असतील तो सेनानी उत्तम ठरेल. निधड्या छातीचाच मात्र सेनापति असेल तर तो विचार बाजूस ठेवून धोक्याची कामें अंगावर घेईल, आणि सेनापति अत्यंत बुद्धिमान असला पण शौर्य धैर्यवान नसला तर तो स्वत:च्या विचारानें योग्य ठरविलेलें काम हि करण्यास कच खाईल.

(९६)

मोठी फत्ते झाली तर ती काकतालीय न्यायानें झाली अगर नशीबानें हात दिल्यानें झाली असे मोठा सेनानी कधींच म्हणणार नाहीं. हिशेबीपणा व प्रतिभा यांच्या मुळेंच एकामागून एक जय मिळत गेले असेंच तो म्हणेल.

(९७)

जेत्यांना त्याच प्रमाणें जितांना सर सेनापति कधींच विश्रांति घेऊं देत नाहीं.

(९८)

तत्त्वांची कांस धरल्यावांचून व योजना आंखल्यावांचून काम करणाऱ्या अनिश्चयी सेनापतीच्या हाताखालीं शत्रुपक्षापेक्षां अधिक सैन्य असलें तरी हि रणक्षेत्रावर स्वतःची शक्ति कमी पडत असल्याचें त्याला आढळून येईल. गबाळेपणानें वागणारा सेनापति व सुवर्णमध्य गांठण्याचा खटाटोप करणारा सेनापति लढाईत शेवटीं सर्व गमवतात.

(९९)

स्थापत्य विभागाच्या सेनापतीच्या अंगीं किल्ल्याच्या व तटबंदीच्या जागा कशा कोठें कराव्यात तें ताबडतोब हेरून त्या प्रमाणें सुचवून तटबंदी करून टाकण्याची कुवत असली पाहिजे. तो व्यवहार कुशल असावा वागतो.

(१००)

घोडदळाचा सेनापति व्यवहार शास्त्रांत तरबेज असावा. त्याला पळा पळांची किंमत माहित असावी. दैवावर भरवसा ठेवणारा तो नसावा.

(१०१)

शत्रूच्या ताब्यांत अगर अखत्याराखालीं जर एखादा सेनापति गेला तर तो आपल्या सैन्याला हुकूम देऊं शकत नाहीं. त्याचा हुकुम मानणारा प्रत्येक इसम गुन्हेगार ठरतो.

(१०२)

आघाडीच्या फौजेबरोबर, पिछाडीच्या फौजेबरोबर व दोहों

बगलावर भारी व सुसज्ज घोडदळ असावें. तसेंच सुटसुटींत घोडदळाला मदतीसाठीं म्हणून भारी सुसज्ज घोडदळ राखून ठेवावें.

(१०३)

कित्येक सेनापति लढाईचा शेवट करण्यासाठीं व मिळविलेला विजय शेवटची चढाई करून कायम करण्यासाठीं ताज्यातवान्या स्थितींत घोडदळ राखून ठेवतात; त्यांना पायदळ व घोडदळ यांच्या संयुक्त हल्लयाच्या शक्तीची व प्रभावाची कल्पना नसते.

(१०४)

घोडदळाची शक्ति त्याच्या त्वरितगतींत असतें हें खरें असलें तरी हि घोडदळाची राघोभरारी हीच कांहीं त्याच्या यशाचें एकमेव कारण असत नाहीं. घोडदळाची सुसंघटणा, त्याची लढाईच्या वेळची मांडणी व आयोजन यांना हि त्याच्या यशाचा योग्य वाटा दिला पाहिजे.

(१०५)

सैन्याच्या किती प्रमाणांत घोडदळ असावें हें ज्या त्या देशाच्या भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असतें फ्लँडर्स व जर्मनींत एकंदर सैन्याच्या चौथा भाग, आल्प्स व पायरीन्समध्यें विसावा भाग, आणि इटली व स्पेनमध्यें एकंदर सैन्याच्या सहावा भाग घोडदळ ठेवलें तर चालण्यासारखें आहे.

(१०६)

वेढ्यांतल्या प्रमाणें लढाईंत हि एकाच ठिकाणावर आगीचा

भडीमार करण्यांत कौशल्य असतें. लढाईस तोंड लागल्याबरोबर कुशल सेनापति एकदम व अनपेक्षितपणें एकाच ठिकाणावर तोफखान्याचा सर्व मार धरून तें ठिकाण खात्रीनें घेऊं शकतो.

(१०७)

पायदळ जितकें अधिक चांगलें तितकाच त्याचा उपयोग अधिक काळजीपूर्वक केला पाहिजे. चांगल्या पायदाळला जोड उत्कृष्ट तोफखान्याची असलीच पाहिजे.

(१०८)

चांगलें पायदळ म्हणजे सैन्याच्या पाठीचा जणूं कणाच. असल्या पायदळाला आपल्या तोफखान्यापेक्षां वरचढ तोफखान्या-समोर पुष्कळवेळपर्यंत सारखें लढत ठेवूं नये. कारण तसें झाल्यास पायदळ हिंमत हरेल, कच खाईल, त्याचा नाश हि होईल. कुशल, हिकमती, व संचलनकुशल सेनापति अशा परिस्थितींत हि मोहिमेच्या कांहीं भागांत चांगल्या पायळाच्या हिंमतीवर वरचढ तोफखान्या समोर जय मिळवूं शकेल. पण निर्णायक दिवशीं, सार्वत्रिक व सर्वांगीण युद्ध चालूं झालें कीं कुशल सेनापतीला हि आपल्या तोफखान्याचा हीनपणा जाणवल्यावांचून राहात नाहीं.

(१०९)

पस्तीस हजार करोळ सैन्य विशेष तटबंदीच्या अगर मोठ्या नदीच्या आश्रयानें स्वतःच्या पेक्षां दुप्पट संख्येच्या सैन्यानें हल्ला केला तरी हि आपल्या तळाची जागा यशस्वीपणें लढवुं शकेल.

(११०)

लढाईमध्यें एकाएकीं अनपेक्षित गोष्टी घडत असतात. असली एक हि गोष्ट सेनापतीच्या नजरेंतून सुटतां कामा नये. अशा अनपेक्षित गोष्टींचा आपल्या हिताकडे उपयोग करून घेण्यांत सेनापतीचें कौशल्य दिसतें. सेनापतीची प्रतिभा अशा वेळीं तळपून दिसते.

(१११)

लढाईमध्यें आपल्याला फायदेशीर क्षण एखादाच येतो, तो ओळखून त्यावेळीं अचूक योजना करण्यांस फार मोठें कौशल्य व प्रतिभा अंगीं असावीं लागतात.

आपल्याला शक्य असेल तेवढें अधिकांत अधिक सैन्य लढवावें. ज्या सेनापती जवळ दिवसाच्या शेवटीं कांहीं ताज्या तवान्या तुकड्या दिसून येतील त्यानें अंगचुकारपणें काम केलें आहे असें समजावें व तो अशा कृत्यामुळें मार खाईल असें कुणी भाकित केलें तर तें बहुधा खोटें ठरणार नाहीं. फायदा होण्या-सारखा असल्यास अगदीं शेवटचा माणूससुद्धां संगरांत ढकल-ण्यास सेनापतीनें मागेंपुढें पाहूं नये. कारण संपूर्ण विजय मिळा-ल्यास त्या दिवशीं दुसरें कांहीं विघ्न उभें राहण्याचा संभव नसतो. जेत्याला दबदबाच आणखी नवें विजय मिळवून देतो.

(११२)

प्रतिपक्षाच्या विजय मिळविलेल्या मोठ्या व संपूर्ण सैन्या

बरोबर आपल्या एखाद्या लहानशा सैन्य भागानें लढाई देणें टाळावें.

(११३)

एखाद्या जागेला अचानक वेढा देऊन प्रतिपक्षानें केलेल्या अंदाजापेक्षां कमी दिवसांत काम केलें तर अशा रीतीनें अनपेक्षितपणें वेळापत्रकांत झालेल्या बचतीचा सेनापतीनें आपल्या भोंवती खंदकांच्या आणि रक्षक भींतींच्या रांगा करून घेण्यांत उपयोग करावा. असें केल्यानें वेढ्यांतील लोकांच्या मदतीला आलेल्या लोकांपासून तो स्वतःचें रक्षण करूं शकेल, त्याची स्थिति बळकट होईल.

(११४)

किल्लयाचा रखवाली (गडकरी) लढाईच्या वेळीं बाहेरील स्वपक्षीय परिस्थितीचा नीटसा अदमास करूं शकत नाहीं. त्यामुळें मिळालेल्या माहितीवरून किल्ला लढविणें कीं सोडणें या पैकीं एक हि निर्णय त्यानें घेतला न पाहिजे. त्याचें काम शेवटपर्यंत गड लढविण्याचें मात्र असतें. तें त्यानें नेटावें व प्राणपणानें केलें पाहिजे, आणि किल्ला आतां सोडलाच पाहिजे त्याशिवाय दुसरी गतीच नाहीं अशी ज्यावेळीं परिस्थिति येईल, त्याला किल्ला सोडणें भागच आहे असा क्षण येईल त्या क्षणापूर्वीं जर त्यानें किल्ला सोडला असें कळलें तर त्याचें डोकें मारलेंच पाहिजे.

(११५)

शरण जाणारास फायदेशीर पण त्यांच्याच पक्षांतील इतरांस

संकटांत टाकणारीं कलमें शरणागतीच्या लेखांत घालून घेणारे लोक पक्षद्रोही समजले पाहिजेत. व त्यांच्याशीं पुढील वर्तन सावधगिरीचें असलें पाहिजे. असे दुष्ट करार करणारांना भ्याड हेंच विशेषण शोभेल.

(११६)

युद्धपद्धति दोन. एक संरक्षक आणि दुसरी आक्रमक. पण संरक्षक युद्ध म्हणजे त्यांत आक्रमक युद्ध नसतेंच असें नाहीं, तसेंच आक्रमक युद्ध खेळतांना हि संरक्षक युद्ध करणें भाग पडतेंच.

(११७)

प्रतिपक्षाच्या सैन्याला बगल देऊन त्याच्या सैन्याला घेरून त्याच्या पाठीवर जाणें व तें हि आपल्या सैन्यांच्या ओळी अखंड ठेवून करणें, यशाच्या दृष्टीनें आवश्यक असतें.

(११८)

रणक्षेत्रावर उभारण्याच्या तटबंदीविषयीं नीट माहिती असली म्हणजे, कुठें कुठल्याप्रकारची तटबंदी आवश्यक आहे याचें सम्यक् ज्ञान झालें म्हणजे असल्या तटबंदीचा चांगला उपयोग करून घेतां येतो.

(११९)

दोन माणसें जेथें उभीं राहूं शकतात असल्या वाटेल त्या जागेवरून वाटेल तेव्हां, वाटेल तिथें, वाटेल त्यावेळीं सैन्य जाऊं शकतें.

(१२०)

युद्ध खेळायचें त्या ठिकाणच्या फक्त जमिनीचीच परिस्थिति लक्षांत घेऊन युद्धाची योजना व कामगिरीचें वाटप करूं नये. सर्वच गोष्टी विचारांत घेऊन प्रत्यक्ष द्वंद्वाची आंखणी व कामगिरीचें वाटप करावें.

(१२१)

फक्त बगलांच्याच चाली होइंतों टाळाव्यात. आणि तसें टाळणें अशक्यच झालें तर मग अशा चाली शक्य तितक्या टुक्या, लहान व अधिकांत अधिक वेगानें कराव्यात.

(१२२)

प्रतिपक्षाच्या सैन्याची संघटना विस्कळित करण्यासाठीं आणि सैन्याचा नाश करण्यासाठीं लूट फाटी करण्याइतकें प्रभावी साधन दुसरें नाहीं.

(१२३)

शत्रु स्तुति करायला लागला की शंकेला कारण होतें. युद्ध संपल्यावर शत्रूनें स्तुति केली तर ती खरी मानायला व स्वाभिमानानें छाती फुगवायला हरकत नाहीं. युद्ध चालू असतां शत्रूनें केलेल्या स्तुतीनें शहाणीं माणसें हुरळून जात नाहींत.

(१२४)

सैनिक युद्ध कैदी झालें तर ज्यांच्यासाठीं ते लढले असतील त्यांचा त्यांवर अखत्यार राहात नाहीं. ज्या राष्ट्रानें त्यांना निःशस्त्र केलें असेल त्यांच्या उदार व मानयुक्त रक्षणाखालीं ते असतात.

(१२५)

जित देश आपल्याला अनुकूल राहील, आपण दिलेल्या आज्ञा पाळील अशी परिस्थिति उत्पन्न कराण्याला नैतिक साधनांची योजना व्हावी. पाशवी शक्ति देश जिंकूं शकेल, मनें जिंकण्याला नैतिक बळच हवें.

जित देशाच्या अंतर्व्यवस्थेंत हात घालूं नये. स्थानिक व्यवस्था जितांवरच सोंपवावी. आपली शासन पद्धति वा संघटन-पद्धतिचा त्यांना लाभ देतां आला तर तो हि देण्यास चुकूं नये.

जित देशांत शांततां व सुव्यवस्था रहावी म्हणून ओलीस ठेवून घेण्याची रीत आहे. पण ही पद्धति परिणामकारक रीतीनें अमलांत आणावयाची असेल तर ओलिसांची संख्या पुष्कळ मोठी असावयास पाहिजे. ओलीस त्या त्या देशांतल्या बहुसंख्य जातींतील घ्यावेत. तसेंच ते समाजाच्या सर्व थरांतील असावें व त्यांत नेत्यांची संख्या हि उणीं नसावी. जितांनीं दिलेल्या वचनांचा अतिक्रम झाल्यास, वचनें मोडल्यास, जेत्यांच्या सैनिकी व्यवस्थेंत अंतराय होईल अशा तऱ्हेनें जित वागल्यास, जितांनीं सैनिक अगर सेनाधिकारी मारल्यास, अपराधांची सवाई भरपाई होईल इतक्या प्रमाणांत ओलिसांचीं डोकीं मारलीं जातील अशी जितांची खातर जमा होईल असाच आधीपासून जितांना धडा दिला पाहिजे.

(१२६)

सैनिकांच्या मनःप्रवृत्ति व शारीर प्रवृत्तिवर देशाच्या हवा-

पाण्यापेक्षां, देशाच्या भौगोलिक परिस्थितीचा, सैनिकाचें जीवन मैदानावर कीं डोंगर कपारींत गेलें आहे त्याचा, शिक्षणाचा व शिस्तीचा अधिक परिणाम होत असतो.

(१२७)

मोठ्या सेनानींनीं मोठीं कामें केलीं तीं युद्धकलेच्या नैसर्गिक तत्त्वांना व नियमांना अनुसरूनच केलीं. त्यांनीं निरनिराळ्या सैन्य घटकांचा योग्य प्रमाणांत उपयोग केला, लक्ष्य काय, उद्दिष्ट काय तें नीट ध्यानांत ठेवून समप्रमाणांत, हिशेबी वृत्तीनें साधनांचा उपयोग केला, अडचणींना तोंड देण्यास झटून अडचणी दूर केल्या. नियमांची कांस धरूनच त्यांनीं सर्व कांहीं केलें—मग तें करतांना कोणी युक्तिबाजपणा अधिक दाखविला असेल तर कोणी बेगुमानपणा अधिक दाखविला असेल. युद्ध हें शास्त्र आहे आणि ते शास्त्रीय पद्धतीनेंच केलें पाहिजे असें दाखवावयास त्यांनीं कधीं कमी केलें नाहीं. शास्त्रीय दृष्टि न सोडल्यामुळेंच त्यांना मोठे विजय मिळाले व ते मोठे झाले. आणि त्यांच्या कृति अभ्यासून त्या योग्य प्रसंगीं वापरून त्यांचें अनुकरण करून अजून हि त्यांच्या इतपत मोठी कामगिरी इतरां कडून हि होऊं शकेल.

(१२८)

सरखेलानें तो हल्ला चढविणार आहे असा संदेश सर्व जहाजांवरील नायकांना दिला कीं ताबडतोब प्रत्येक नायकानें हल्ला

करण्याला योग्य अशा हालचाली केल्या पाहिजेत, लढाईत भाग घेतला पाहिजे व आपल्या शेजाऱ्याला हि मदत केली पाहिजे.

(१२९)

सामान्यतः खुष्कीच्या लढाईत आरमारी लढाईपेक्षां अधिक माणसें कामास येतात. खुष्कीची लढाई अधिक भीषण असते. आरमारांतला नौसैनिक एका मोहिमेंत एकदांच लढतो. जमिनी-वरील सैनिकाला रोजच लढावें लागतें. समुद्रावर कष्ट व संकटें असतील पण एकंदरीनें नौसैनिकाला जमीनीवरील सैनिकापेक्षां सोसावें लागतें कमींच. नौसैनिकाला भूक तहानेनें व्याकुळ होण्याचा प्रसंग येत नाहीं, त्याचें सैंपाकघर, त्याचें ऋग्णालय, त्याचा दवाखाना, त्याची झोंपण्याची जागा सर्व कांहीं त्याला जेथल्या तेथें मिळतें. इंग्रजी व फ्रेंच सैन्यांपेक्षा त्यांच्या आरमारांत आजारीपणाचें प्रमाण कमी नोंधलें गेलें आहे; कारण जहाजावरील शिस्तीमुळें स्वच्छता राहू शकते व आजपर्यंतच्या अनुभवानें प्रकृति निकोप राखण्याचीं साधनें पुष्कळच निर्माण केली आहेत त्यांचा हि आरमारांतील सैनिकास अधिक उपयोग होऊं शकतो. लढाईच्या संकटांवाचून वादळी संकटांना दर्यावर तोंड द्यावें लागतें हें खरें असलें तरी हि नौकानयन शास्त्रांत इतकी प्रगति झाली आहे कीं आतां अशा संकटांची फारशी भीति राहिली नाहीं. पण देशांतील जमिनीवरील संकटाशीं समुद्रावरील संकटांची तुला होणार नाहीं; लोकांचीं बंडें, खून, मारामाऱ्या, सुटसुटीत

जथ्यांचे अचानक हल्ले या व असल्या संकटांचा समुद्रावर मागमूस हि नसतो.

(१३०)

सरखेल व सेनापति यांचीं कामें इतकीं भिन्न स्वरूपाचीं असतात कीं तीं कामें करणाऱ्यांच्या अंगांत वेगवेगळ्या प्रकारचे गुण असावें लागतात. नेतृत्वाचा गुण सेनापतीच्या अंगीं उपजतच असावा लागतो, तर तो गुण अनुभवानें सरखेलाच्या अंगीं आणूं शकतो.

(१३१)

जमीनीवरील युद्धाची कला ही प्रतिभा व स्फूर्तिवर अधिष्ठित असलेली कला आहे. पण आरमारी लढाईच्या कलेला प्रतिभा आणि स्फूर्तिचें अधिष्ठान लागतेंच असें नाहीं. समुद्रावर करावयाची प्रत्येक वस्तु निश्चित असतें आणि त्यामुळेंच अनुभवानें ती करतां येण्यासारखी असते. सरखेलाला नौकानयन शास्त्राचें उत्तमज्ञान असलें म्हणजे इतर कांहीं गोष्टींच्या ज्ञानाची आवश्यकता राहात नाहीं. पण सेनापतीचें तसें नाहीं, त्याला सर्वच शास्त्रांची थोडीफार माहिती असावीच लागते. सर्व तऱ्हेचा अनुभव व सर्व तऱ्हेचें ज्ञान हस्तगत करून सेनापतीला स्वपक्षाचा फायदा करून घ्यावयाचा असतो. सरखेलावर भविष्यवाद्याप्रमाणें कांहीं गोष्टी हुडकून काढण्याचा प्रसंग येत नाहीं. शत्रू कोठें आहे, त्याचें बळ किती आहे हें सरखेलाला नक्की

माहीत असते. सेनापतीला नक्की अशी कशाचीच माहिती नसते, त्याला शत्रु तर दिसत नाहींच, पण शत्रूचें नक्की बळ किती आहे तें हि कळत नाहीं. दोन सैन्यें समोरासमोर उभीं ठाकलीं तरी हि भूपृष्ठाचा यत्किंचित् चढ उतार अगर एखादें छोटेसें जंगल प्रतिपक्षाच्या सैन्याचा कांहीं भाग झांकूं शकतात. अगदीं अत्यंत अनुभवी डोळ्यांना हि समोर दिसणारें सैन्य सबंध आहे कां त्याचा अर्धा उणा भाग आहे तें नक्की सांगता येत नाहीं. चर्मचक्षूंनीं नव्हे तर अंतश्चक्षूंनीं सेनापति पाहतो, तसें पाहून मग त्याचें तर्कानें आकलन करतो, व स्फूर्तिनें काय करावयाचें तें ठरवितो व करतो. नौसेनाधिपाचे डोळे अनुभवी असतील तर एका कटाक्षांतच तो शत्रूचें बळ किती आहे तें पाहूं शकतो, त्याच्या दृष्टींतून कांहीं हि लपून राहूं शकत नाहीं.

(१३२)

सेनापतीचें काम आणखी एका कारणामुळें कठिण होतें. त्याला माणसें, जनावरें, वाहनें, शस्त्रास्त्रें यांचा केवढा तरी मोठा अटाळा संभाळावा लागतो; सरखेलाला असला खटाटोप करावा लागत नाहीं, त्याचा त्याला त्रास होत नाहीं, नौसेनाधिपाला लागणाऱ्या सर्वच वस्तु त्याच्या जवळ असतात. सरखेलाला टेहळणी फारकाळ व फारशी करावी लागत नाहीं, भूपृष्ठाच्या उंचनिंचपणा त्याच्या आड येत नाहीं, लढाईचें क्षेत्र अभ्यसण्याची जरूर राहात नाहीं. हिंदी महासागर, प्रशांत महासागर, उत्तर समुद्र-कुठें हि जा त्याचें क्षेत्र नेहमींच जलसपाटी असते. अत्यंत प्रतिभावान्

माणसाला हि आपलें कौशल्य कुठें, कसें वापरावयाचें त्याची पंचाईत पडण्याचा प्रसंग येतो, त्याच्या प्रतिभेला वावच राहात नाहीं. अमुक किनाऱ्यावर अमुक तऱ्हांचीं वारीं असतात, अमुक ठिकाणीं अमुक रीतीचे जलप्रवाह असतात, असल्या ज्ञानाचा काय तो सरखेलाला उपयोग. हें ज्ञान अनुभवानें मिळण्यासारखें असतें.

(१३३)

सेनापतीला कुठल्या, कसल्या प्रकारच्या मैदानावर लढाई द्यावी लागेल तें माहित नसतें. त्याची स्फूर्ति हींच त्याची माहिती. त्याला नक्की अशी माहिती मिळालेली नसतें. निरनिराळ्या जागीं माहितीची मिळालेली सामग्री इतकी एक दुसऱ्यावर अवलंबून असते कीं निव्वळ अनुभवानें कांहींच ठरविण्याला वाव नसते. शेवटीं असेंच म्हणावें लागतें कीं सैनिकी परिस्थिति कशी काय आहे तें अेका दृष्टिक्षेपांत जाणतां येणें ही दैवी देणगी आहे. तरी हि वाचन आणि संवय यांमुळें नकाशे वांचण्याच्या कामांत व भूपृष्ठाच्या अभ्यासाच्या कामांत मदत होऊं शकते.

(१३४)

सरखेल त्याच्या जहाजाच्या सरदारांवर जितका अवलंबून असतो तितका सेनापति त्याच्या दुसऱ्या सेनानायकावर अवलंबून नसतो. सेनापति सर्व सैन्याचा ताबा वाटेल तेव्हां घेऊं शकतो, व एका विवक्षित स्थळीं सैन्य नेऊं शकतो, तसेंच चुकीची हालचाल झाली असली तरी तो ती दुरुस्त करून घेऊं शकतो. नौसेनाधिप

ज्या जहाजावर असेल त्या जहाजावरील लोकांवरच तो स्वतःची छाप बसवूं शकतो, धुरामुळें त्याला खुणा पाहणें तसेंच दिसणें कठिण होतें, वाऱ्यामुळें त्यानें लावलेल्या मिसलींत फेरफार होतात, आणि या सर्वच गोष्टी परस्वाधीन असल्यामुळें एखादे वेळीं चुकीची दुरुस्ती वेळच्यावेळीं होऊं शकत नाहीं. नौयुद्धाचा धंधा असा आहे कीं त्यांत केव्हां केव्हां खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्यावर पुढाकार घेण्याचे प्रसंग येतात.

कोश

☆

इंग्रजी–मराठी

Admiral	सरखेल.
Advance	पुढें सरणें (विरोध असतांहि), चाल
Advance base	अघाडीची कोठी.
Advance guard	आक्रमण संरक्षक पथक. अघाडीचें सैन्य.
Bear down	चालून जाणें, हल्ला चढविणें, झडपणें.
Bivouac	रात्रीचा (वधाऱ्याचा) चौकी पहारा.
Bridge-head	नदीपार ठाणें.
Camp	गोट, तळ.
Campaign	मोहीम.
Cantonment	छावणी, तळ.
Cavalry	घोडदळ.
Charge	गर्दी, झडप, हल्ला.
Charges of powder	दारूची बारुदें.
Chief of staff	कार्यदर्शी सेनापति.
Column	तुकडी, गट, जथ्था, स्तबक, थोक, टोळी, टोळकें, जमाव, सैन्य समूह.
Conquest	मुलुखगिरी.
Convoy	तांडा (संरक्षित).
Core	दळ.
Cover	डोसा, पडदपाशी.
Defensive warfare	संरक्षक युद्धपद्धति. बचावाची युद्धपद्धति.
Defile	खिंड, अरुंद वाट.

Defile	सैन्याची एकरा अगर दुहेरी ओळ करणें.
Deploy	सैन्य पसरणें, गटबंद सैन्यं असेल, तर तें ओळबंद अगर हारबंद करणें.
Depot	पुरवठा केन्द्र, तळ, कोठी.
Entrenchment	खंदक बंदी.
Field fortifications	रणक्षेत्रावरील तटबंदी.
Flank	बगल, पांखें.
Flank march	बगली कूच.
Front	अघाडी, तोंड.
Frontal	सरळ, समोरचा, ताडावरचा.
Fort	किल्ला, गड.
Fortification	तटबंदी, तटबंद ठिकाण, कोट.
Fortified position	तटबंद ठाणें, तटबंद ठिकाण, गढी, कोटकिल्ला.
Garrison	शिबंदी.
Heavy	अवजड, सुसज्ज.
Infantry	पायदळ.
Light	सुटसुटीत.
Line	फळी, ओळ, हार, रांग, मार्ग.
Line of advance	कूचाचा मार्ग, चालीचा मार्ग.
Line of battle	लढाईचा पवित्रा, लढाईचा मार्ग, लढाईसाठीं केलेली सैन्य रचना.
Lines of circumvallation	खंदकाचे अगर बुरुजाचे घेरे.
Lines of communication	दळणवळणाचे आणि संदेशाचे मार्ग.
Lines of contravallation	छाती इतपत उंचीचीं भिंताडे, कोट व ओटे वगैरे.
Lines of operation	रणक्षेत्रांत वावरण्याचे मार्ग अगर वाटा, सैन्याच्या हालचालीचे मार्ग.

Manoevres	हालचाली, पूर्वनियोजित हालचाली, फसव्या हालचाली, युद्धाची रंगीत तालीम.
March	कूच,
Mask	पडद्पोशी, पिधान, आवरण.
Moral	हिंमत, आत्मविश्वास
Napsack	पडशी
Naval engagement	नाविक लढाई, नौयुद्ध, नाविकयुद्ध
Navy	नौसैन्य, आरमार
Offensive	चढाई, आक्रमण
Offensive warfare	आक्रमक युद्धपद्धति
Operation	हालहाल
Order of battle	व्यूह, लढाईसाठीं सैन्याची केलेली शिस्तबद्ध रचना
Order of the day	दैनिक आज्ञापत्र
Organization	संघटना
Park	तोफखाना व त्याला उपयोगी सामान गोठविलेली जागा
Point	बिंदु, ठिकाण. विवक्षित स्थळ
Position, Post	जागा, ठिंकाण, ठाणें
Rear	पिछाडी, पाठ
Reserve	राखीव
Siege equipage	वेढ्याची साधनसामग्री
Stategy	डावपेंच, लढाईचें युद्धाचें आयोजन
Supernumerary	हरकाम्या
Tactics	हिकमती
Topography	भौगोलिक मांडणी, जमीनीचा उंच-निंच (सखल) पणा, जमिनीचा परिस्थिति
Troops	प्यादीं

कोश

☆

मराठी इंग्रजी

अडोसा	Cover
अघाडी	Front
अघाडीची कोठी	Advance base
अघाडीचें सैन्य	Advance guard
अरुंद वाट	Defile
अवजड	Heavy
आक्रमक युद्ध (पद्धति)	Offensive war (fare)
आक्रमण	Offensive
आक्रमण संरक्षक पथक (सैन्य)	Advance guard
आत्मविश्वास	Morale
आरमार	Navy
आवरण	Mask
ओळ	Line
कार्यदर्शी सेनापति	Chief of staff
किल्ला	Fort
कूच	March
कूचाचा मार्ग	Line of advance
कोट	Fortification
कोटकिल्ला	Fortification, Fortified position
कोठी	Base, Fortified position
खंदकबंदी	Entrenchment
खंदकांचे घेरे	Lines of circumvallation
खिंड	Defile
गट	Column

गड	Fort
गढी	Fortified position
गर्दी	Charge
गोट	Camp
घोडदळ	Cavalry
चढाई	Offensive
चढाईची युद्धपद्धति	Offensive warfare
चढाईचें युद्ध	Offensive war
चाल	Advance
चालीचा मार्ग	Line of advance
चालून जाणें	Bear down
छाती इतपत उंचीचीं भिताडें, कोट, ओटे वगैरेच्या रांगा	Lines of contravallation
छावणी	Cantonment
जथ्था	Column
जमाव	Column
जमिनीचा उंच निंच (सखल) पणा	Toporgaphy
जमिनीची परिस्थिति	Toporgaphy
जमिनीची मांडणी	Toporgaphy
जागा	Position, Post
झडप	Charge
झडपणें	Bear down
टोळकें	Column
टोळी	Column
ठाणें	Position, Post
ठिकाण	Point, Position, Post
डावपें	Strategy
तटबंद ठाणें	Fortified position
तटबंद ठिकाण	Fortification, Fortified position

तटबंदी	Fortification
तळ	Camp, Cantonment
तांडा	Convoy
तुकडी	Column
तोंड	Front
तोंडावरचा	Frontal
तोंडा समोरचा	Frontal
तोफखाना व त्याला उपयोगी सामान गोठविण्याची जागा	Park
थोक	Column
दळ	Core
दळणवळणाचे मार्ग	Lines of communication
दारूचीं बारुदें	Charges of powder
दैनिक आज्ञापत्र–	Order of the day
नदीपार ठाणें–	Bridgehead
नाविक युद्ध	
नावाकि लढाई	Naval engagement
नौयुद्ध	
नौसैन्य	Navy
पडदपोशी–	Cover, Mask
पडशी–	Napsack
पाठ–	Rear
पायदळ–	Infantry
पांखें–	Flank
पिछाडी–	Rear
पिधान–	Cover, Mask
पुढें सरणें (विरोध असतांहि)	Advance
पुरवठा केंद्र–	Supply base
पूर्वनियोजित हालचालां–	Manoevres

प्यादीं–	Troops
फळी–	Line
फसव्या हालचाली–	Manoevres
बगल–	Flank
बगली कूच–	Flank march
बचावाची युद्धपद्धति–	Defensive warfare
बचावाचें युद्ध–	Defensive war
बिंदु–	Point
बुरुजांचे घेरे–	Lines of circumvallation
भौगोलिक मांडणी–	Topography
मार्ग–	Line
मुलुखगिरी–	Conquest
मोहीम –	Campaign
युद्ध—	War
युद्धाची रंगीत तालीम—	Manoevrs
युद्धाच आयोजन –	Strategy
रणक्षेत्रावरील तटबंदी (मुईकोट)	Field fortifications
रणक्षेत्रांत वावरण्याचें मार्ग (वाटा)	Lines of operation
राखींव—	Reserve
रांग—	Line
रात्रीचा (वधाऱ्याचा) चौकी पहारा	Bivouac
लढाई—	Battle
लढाईचा पवित्रा –	Line of battle
लढाईचा मार्ग—	Line of battle
लढाईचें आयोजन—	Strategy
लढाईसाठीं केलेली सैन्य रचना –	Line of battle
लढाईसाठीं केलेली शिस्तबद्ध सैन्य रचना—	Order of battle
विवाक्षित स्थळ –	Point

वेढ्याची साधनसामग्री —	Siege equipage
व्यूह —	Order of battle
शिबंदी —	Garrison
समोरचा —	Frontal
सरखेल —	Admiral
सरळ—	Frontal
सुटसुटीत—	Light
सुसज्ज—	Heavy
सैन्य गटबंद असेल तर ओळ (हार) बंद करणें—	Deploy
सैन्य पसरणें	Deploy
सैन्य समूह—	Column
सैन्याची एकेरी अगर दुहेरी ओळ करणें —	Defile
सैन्याच्या हालचालीचे मार्ग—	Lines of operation
संघटना--	Organization
संदेशाचे मार्ग—	Lines of communication
संरक्षक युद्ध (पद्धति)	Defensive war (fare)
स्तबक —	Column
हरकाम्या —	Supernumerary
हल्ला —	Charge
हल्ला चढविणें —	Bear down
हार—	Line
हालचाल —	Operation
हालचाला —	Manoevres
हिकमती —	Tactics
हिंमत —	Morale

———

सूचि

★

अघाडीच्या पथकावरील सेनापति ५३, ५४, ५५, ५६
अघाडी संरक्षक पथक १७
अनिश्चयी सेनापति
—लढाई गमावतो ५७
अलेक्झांडर ५५
आक्रमक युद्ध १०, ११
आक्रमण संरक्षक पथक
— कामगिरी २९, ३०
—भरती २९, ३०
—सेनापतीचे गुण २९, ३०
आगीचा भडिमार ५८, ५९
उत्तम सेनानी ५६
ऊर्ध्व बाजू १२
कार्यदर्शी सेनापति ५३
किल्ल्याचा रखवाली ५३
—शेवटपर्यंत लढला पाहिजे ५३
खाडिलकर कृ. प्र. ३
गडकरी

—शेवटपर्यंत लढला पाहिजे ५३
गुस्टाव्हस ५५
घोडदळ
—कोणतें कोठें ठेवावें ५७, ५८
—जय टिकवून धरण्यासाठीं उपयोग ४१
—यशाचा वाटा ५८
—लढाईचा शेवट करण्यासाठीं राखून ठेवण्याची जरूर ५८
—सैन्याशीं प्रमाण ५८
घोडदळाचा सेनापति ५७
घोडदळाची गर्दी
—केव्हां करावी ४०
जानपद युद्धतंत्र ४
जित देशांत वागण्याची रीत ४९, ६४
टेहळीं पथकें १७, १८
तटबंदी ठाणें
—उपयोग ३४, ३८
तडित् युद्धतंत्र ४
तुरीन ५५
तोफखाना
—कुठें मांडावा ४२
—केव्हांहि उपयोगांत येईल असा ठेवावा १७
—खिंडींतून अगर अरुंद वाटेवरून केव्हां कसा न्यावा ३०

—घोडदळास अधिक गरज ४१
—राखीव ४१, ४२
—व्यवस्था ४१, ४२
तोफखान्यावरील सेनापति ५३
देशपांडे ह. वा. ४
नदी उतरणें
—नदी ओलांडताना करावयाच्या तजविजी ३१, ३२, ३३
नदीपार ठाणीं
—कोठें करावीत ३३
—शत्रूनें आपल्याबाजूस केलीं असल्यास शत्रूवर समोरून हल्ला करूं नये ३१
नेपोलिअन ७
पायदळ
—आपल्या तोफखान्यापेक्षां वरचढ तोफखान्या समोर उपयोग ५९
—चांगल्या पायदळाचा उपयोग अधिक काळजीपूर्वक करावा ५९
पिछाडीच्या फौजेवरील सेनापति ५५, ५६
फोन क्लॉझेवित्स ७
फोन डर गोल्त्स ७
फ्रेडरिक दि ग्रेट ७, ५५
बगल संरक्षक पथक १७

बगली कूच
—केव्हां करूं नये २८, २९
बचावाची लढाई २३
बचावाचें युद्ध १०
बळकट ठाणीं
—समोरून घेण्याचा प्रयत्न करूं नये २३
मराठे (श्री.) ४
मराठे व युद्ध नेतृत्व ५
—व शिपाईगिरी ५
—श्री शिवरायाचे ५
मराठ्यांचें युद्धनेतृत्व ५, ६
मॉरिस डी साक्झे ७
मुक्काम
—सैन्याचा तंबूत नसावा डघड्यावर असावा ४४, ४५
—सेनापतीचा तंबूत असावा ४५
मोडक (कॅप्टन) ३
मोहिमेचा आराखडा
—आंखताना लक्षांत घ्यावयाच्या गोष्टी ११
मोहीम
—सुरवात केल्यावर माघार घेऊं नये १६
—सुरवात विचारानें करावी १६
युद्ध

—आक्रमक १०, ११
—कामगिरीचें वांटप ६३
—पद्धतशीर करावें १५, १६
—बचावाचें १०, १९
—युद्धांत प्रतिपक्षाचें सैन्य विस्कळित
करण्याचे इलाज ६३
—बगलांच्या चाली टाळाव्यात ६३
—शत्रूनें केलेली स्तुति संशयास कारण होतें ६३
—युद्ध शास्त्रीय रीतीनें केलें पाहिजे या मतास मातबर
सेनानींच्या वागण्यानें बळकटी येते ६५
—संरक्षक १०, ११
युद्धकैदी
— कैदी ४९
—कैद्यांकडून मिळालेली माहिती उपयोग केव्हां करावा ४६
—कैद्यावर अखत्यार कुणाचा ६३
युद्ध जिंकण्याची योजना
—कोणती निष्फळ व कोणती सफळ होते ४७
युद्धतंत्र
—जानपद ४
—तडित् ४
युद्धनेतृत्व
—एकसूत्री असावें ४६

—मराठ्यांचें ५
युद्धपद्धति ६२
युद्धमान सैन्य
—तीन अंगें ११, १२
युद्धसाहित्य
—मराठी भाषेंत अल्प आहे ३
—प्रकाशक ३
—लेखक
यूजेन ५५
योमिनि ७
राष्ट्राचें बलाबल
—माहिती दुसऱ्यास पुरवूं नये ५०
लढण्याच्या तऱ्हा
— परिस्थिति सापेक्ष २६, २७
लढाई
—निर्णायक लढाईचे वेळीं यश मिळण्यासारखा दरेक मोका साधावा २९
— पूर्वी उत्तेजक भाषणें करण्याविषयीं ४४
—पूर्वी भाषणें व वादविवादांचा उपयोग ४४
—स तोंड लागण्याच्या आदल्या दिवशीं सैन्यापैकी थोडाहि भाग दुसरीकडे पाठवूं नये २७, २८
—साठीं घोडदळ पायदळाची व्यवस्था ३९, ४०

—साठीं पवित्रा घेतल्यावर आपल्या दोन सैन्यांत शत्रूस
पांचर मारतां येईल अशा तऱ्हेनें रचना करूं नये ३०, ३१
—साठीं पायदळ गोठविण्याची रीत ४०
—सुरूं करण्यापूर्वी सर्वशक्ति एकवटावी २८
—सुरूं झाल्यावर सर्व शक्ति वापरावी २८
वावरण्याच्या वाटा अथवा मार्ग १३
—कोठें व कसें ठेवावेत १४
—सामान्यतः बदलूं नयेत पण बदलणें भाग पडल्यास
शत्रु फसेल अशा रीतीनें बदलावें २४
—सैन्यांतील गटांचे मार्ग १४
विजयी सैन्य
—अशा सैन्या समोर छोट्याशा सैन्यभागानें लढाई
देऊं नये ६०, ६१
वेढा
—देऊन बसलें असतां शत्रूच्या मदतीला येणाऱ्या सैन्यावर
हल्ला चढवावा कीं कसें ? ३७
—देण्यासाठीं मनुष्यबळ किती पाहिजे ३६, ३७
—देण्यासाठीं लागतें त्यापेक्षां अधिक मनुष्यबळ असलें
तर त्याचा उपयोग ३६, ३७
—देतांना करण्याच्या तजविजी ३६
—देतांना झालेल्या वेळेच्या बचतीचा सदुपयोग ६१
—यशस्वी करण्याचे मार्ग ३४, ३५

—वेढलेल्या तटबंदीच्या ठाण्यांत ऋणालय व कोठार असलें तर शिबंदीनें काय करावें ३७, ३८
व्हेजिटिअस ७
शत्रु
—ची इच्छा व आपली कृति २१, २२
—च्या ताब्यांत गेलेला सेनापति ५७
—च्या पाठीवर जाणें यशाच्या दृष्टीनें आवश्यक ६२
शत्रु सैन्य
—प्रबळ असेल तर लढण्याची रीत १८, १९, २२
—शत्रु सैन्याचा नदी उतार आपल्यास थांबवितां येणें साधत नसेल तर करावयाच्या गोष्टी ३३
शरणागति
—इलाज खुंटला तरच शरण जावें ३८
—ची परवानगी शिबंदीसच असावी इतर कोणासहि नसावी ४७, ४८
—च्या अटी स्वतःस फायदेशीर पण स्वपक्षास हानिकारक अशा स्वीकारणारे पक्षद्रोही ६१, ६२
—प्राणपणानें लढलेल्या शिबंदीस अटी न घालतां शरण येऊं द्यावें ३९
—शरण न जातां शत्रूला कापीत निघून जावें असें एक मत ३८

—स्वपक्षाच्या हिताविरुद्ध अटी स्वीकारून शरण जाण्याची परवानगी कोणासहि नाहीं ४८, ४९
शिंदे जनरल नानासाहेब ३
सकाळ (दैनिक) ४
समोरचा हल्ला
—केव्हां करूं नये २२
सर केलेली जागा
—शत्रूनें घेतली तर ताबडतोब चढाईच्या हालचाली करव्यात २५
सरखेल व सेनापति
—कामगिरी, तुलना ६५–७०
सर सेनापति
—अवश्य गुण ५२, ५४, ५५
—व राजा अगर प्रधानांचे हुकूम ५०, ५१
—विजय मिळत असतां लढाई थांबविण्याची राजाज्ञा ५१,५२
सरहद्द
—अडथळ्याचे दृष्टीनें क्रमयादी १०
—निरनिराळे प्रकार ९
—हिंदुस्थानची नवी ५
सीझर ५५
सीमाप्रांत ९
सुन त्सु ७

सेनापति
—अघाडीच्या पथकावरील २९, ५३–५६
—अनिश्चयी ५७
—आक्रमण संरक्षक पथकावरील २९, ३०
—उत्तम ५६
—कसा असावा ४७
—कार्यदर्शी ५३
—घोडदळाचा ५७
—चा यशोगौरव २१
—तोफखान्यावरील ५३
—नें स्वसैन्याच्या रक्षणाचें नेहमीं चिंतन करावें १८
—पिछाडीच्या फौजावरील ५५, ५६
—व सरखेल, कार्य, तुलना ६५–७०
—शत्रूच्या ताब्यांत गेलेला ५७
—स मिळणाऱ्या माहितीचें मूल्यपान ५२
—स्थापत्य विभागाचा ५७
सैनिक
—आवश्यक गुण ४३
—आवश्यक वस्तु ४३
—कायम नोकरींत राहील असें करावें ४३, ४४
—खाजगी घरांतून खाना घेण्यास परवानगी नसावी ४२
सैन्य

—कशा प्रदेशांतून जाऊं शकेल ६२

—केव्हां उभारतां येईल ४३

—गोट अथवा तळ ३१

—चाल १२, १३

—चांगलें केव्हां म्हणावें

—तीन अंगें ११, १२

—प्रतिकार क्षमता १६, १७

—प्रतिकारासाठीं नेहमीं सिद्ध पाहिजे १६, १७

—मुक्काम तंबूंत देऊं नये ४४

—मुक्काम तंबूत न देण्याचीं कारणें ४४, ४५, ४६

—मुक्कामासाठीं स्थळाची निवड १७

—लढाईच्या वेळीं अधिकांत अधिक लढवावें ६०

—शक्तिचें मोजमाप १८

—हिंदुस्थानचें नवें सैन्य कसें हवें ५, ६

सैन्याचा तळ

—टाकण्याची रीत २४, २५, २६

—वाईट जागी असेल तर लढण्याची रीत २२, २३

सैन्याचा मध्य अथवा तोंड ११, २२

सैन्याचा यशोगौरव २१, २३

सैन्याची चाल

—चालीच्या वाटेंत काय काय असणें इष्ट २०

——चालीच्या वेळीं दोन सैन्य विभागांतील अंतर किती असावें २०

——चालीच्या वेळीं पांखांची (बगलांची) संभवित परिस्थिति व त्या विषयीं घ्यावयाची काळजी १२, १३

सैन्याची प्रतिकार क्षमता

——युद्धांत पुरतेपणी वापरावी १६, १७

सैन्याचीं अंगें ३९

सैन्याचीं पांखें (बगला) १०—१२

सैन्याचे गोट अथवा तळ

——एकमेकास मदत करूं शकतील असें टाकावेत ३१

सैन्याच्या हालचाली

——चा मार्ग खबरदारीनें सांभाळावा १९

——दोन मार्गांवर एका वेळीं करूं नयेत १९, २०

संरक्षक युद्ध १०, ११

स्थापत्य विभागाचा सेनापति ५७

हानिबाल ५५

हिंदुस्थानाचें सैन्य

——कसें हवें ५, ६

युद्धसूक्ति

शततारक

नेपोलियनप्रणीत
युद्धशास्त्राचे मूलभूत सिद्धांत

रु. १

मुद्रक व प्रकाशक :
कृ. वा. मराठे
श्रीरामविजय छापखाना, बडोदें.